केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
शिवम प्रॉपर्टीज
SHIVAM PROPERTIES
संपर्क - 9822116347, 9881620700



RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

Volume - 74 | Issue- 125 | Marathi Daily | Saturday 17/1/2026 | Pages - 8 | Price- Rs. 3




गुलाबजामुन, पेढे (फिके कंदी), बासुंदी, जिलेबी, मलाई बर्फी, बुंदी लाडू, समोसा, ढोकळा, कचोरी
महाराष्ट्रसह जिल्ह्यातील प्रसिद्ध मिठाई श्रेणीतील एक अग्रगण्य नाव
१०३ वर्ष
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहमदनगर.
Mo. 9860566509




# विजयाची जबाबदारी

बहुप्रतिक्षीत असलेल्या महापालिकांच्या निवडणुका १५ तारखेला राज्यभर पार पडल्या. काल झालेल्या मतमोजणीमध्ये पुन्हा एकदा महायुतीच्या बाजूने निकाल लागला. यामध्ये भाजपाने लातूर आणि चंद्रपूरचा अपवाद सोडता सर्वत्र बाजी मारली. बहुचर्चित मुंबई महापालिकेचा गडदेखील भाजपा-शिंदे सेना युतीने राखला. विधानसभेनंतर पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्व कौशल्यावर शिक्कामोर्तब झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विजयाचे स्वागत करताना त्यांचे अभिनंदन जरुर केले, पण त्याचवेळी विजयाचा उन्माद होऊ देऊ नका, असा मार्मिक आणि समयसूचक सल्ला देखील दिला. या



विविध विशेष
ज्ञानेश कुलकर्णी

छोट्याशा संदेशात मुख्यमंत्री फडणवीस बरेच काही सांगून गेले!

अहिल्यानगर महापालिकेत भाजपा-राष्ट्रवादी युतीने ६८ पैकी तब्बल ५२ जागा जिंकत आजवरच्या पालिका इतिहासात एक नवा विक्रम प्रस्थापित केला. सर्वत्र छोट्या भावाच्या भूमिकेत असणारा राष्ट्रवादी पक्ष इथे मात्र मोठ्या भावाच्या भूमिकेत दिसून येत आहे. यावेळच्या निवडणुकीचे अनेक प्रकारे विश्लेषण करता येऊ शकेल.

सुरुवातीपासूनच अहिल्यानगरची निवडणूक चर्चेत राहिली. इच्छुकांची संख्या खूप अधिक, युती कि महायुती हा संभ्रम, त्यामुळे बंडखोरांची भीती नक्कीच होती. इच्छुक उमेदवारांना अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस उजाडला तरी नक्की काय निर्णय घ्यायचा हे कळत नव्हते. अर्थात हा निवडणुक स्ट्रॅटेजीचाच एक भाग होता.

यावेळची निवडणूक गाजली ती जगताप-विखे या जोडगोळीमुळे! आ. संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे या द्वयीने ही निवडणूक पूर्णपणे हातात घेतली. (पान २ वर)


किचन आयुष्यात एकदाच तयार होते. आपले किचन बनवण्यापूर्वी व्यवस्थित माहिती घेऊन अभ्यासपूर्ण निर्णय घ्या.
झाले बहु होतील बहु परि या सम हाच.. आत्मनिर्भर
न्यू बॉम्बे किचन्स
लालटाकी, अ.नगर
संपर्क
98222 94670
98909 85601
98222 61341


## राष्ट्रवादी-भाजपात इच्छुकांची संख्या मोठी
# महापालिकेत युतीतील सत्ता वाटप कसे?

**समाचार/नगर-दि.१७**

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी- भाजपा युतीने निर्विवाद वर्चस्व मिळविले. युतीने ६८ पैकी ५२ जागा जिंकल्या आहेत. शिवसेनेसह महाविकास आघाडी या निवडणुकीत भुईसपाट झाली आहे. दरम्यान, युतीने जोरदार विजय मिळविल्याने आता, महापौर कोण होणार, तसेच महापालिकेतील इतर सत्तापदांवर कोणाची वर्णी लागणार? याकडे लक्ष लागले आहे. महापालिकेत महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, महिला बालकल्याण समिती सभापती व उपसभापती अशी पदे आहेत. या पदांबाबत राष्ट्रवादी व भाजपात कसा फॉर्म्युला ठरतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

महापालिका निवडणुकीतील निकालानंतर शहराच्या राजकारणात बदल पहायला मिळणार आहेत. या निवडणुकीने विरोधक कमजोर झाले आहेत. राष्ट्रवादी- भाजपा युतीने एकहाती सत्ता मिळविली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सर्वाधिक २७ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपाने २५ जागांवर विजय मिळवला आहे. महापालिकेचा निकाल लागून नवे कारभारी कोण, हे स्पष्ट झाले



असले तरी अद्याप महापौरपदाचे आरक्षण जाहीर झालेले नाही. त्यामुळे पुढील काही दिवसात ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापौरपदासाठी कोणाला नेमकी संधी मिळणार, हे स्पष्ट होणार आहे. राष्ट्रवादीकडून अविनाश घुले, गणेश भोसले, संपत बारस्कर, कुमार वाकळे, सुरेश बनसोडे, मयुर बांगरे यांची नावे चर्चेत आहेत. भाजपाकडून धनंजय जाधव, सुभाष लोंढे, बाबासाहेब वाकळे, निखील वारे, मनोज कोतकर, पुष्पा बोरूडे, ऋग्वेद गंधे यांच्या नावांची चर्चा आहे.

महापालिकेत महापौरपद मागील पहिल्या अडीच वर्षासाठी सर्वसाधारण गटासाठी आणि नंतरचे अडीच वर्षे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव होते. त्यामुळे या निकालानंतर आता महापौरपदाची सोडत कधी निघणार, याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. हे आरक्षण पडण्यासाठी किमान दोन ते तीन आठवड्यांची प्रतीक्षा लागण्याची शक्यता आहे.

### राष्ट्रवादीचे दावेदार

अविनाश घुले, गणेश भोसले, संपत बारस्कर, कुमार वाकळे, सुरेश बनसोडे, मयूर बांगरे, ज्योती गाडे, अनिता शेटीया, सुजाता पडोळे

### विरोधी पक्षनेतेपदही सत्ताधाऱ्यांकडेच?

महापालिकेत दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवणाऱ्या पक्षाला विरोधी पक्षनेतापद दिले जाते. त्यामुळे आता विरोधी पक्षनेतापद सत्ताधारी आपल्याकडेच ठेवतील, असे दिसते आहे. विरोधकांना विरोधी पक्षनेतेपद मिळण्याचीही शक्यता कमीच आहे.

### भाजपाचे दावेदार

धनंजय जाधव, सुभाष लोंढे, बाबासाहेब वाकळे, निखील वारे, ऋग्वेद गंधे, पुष्पा बोरूडे, शारदा ढवण, वर्षा सानप

## उठाठेव
– विवेक मेहेत्रे




**लोकांना मतदानाची माहिती समजावून सांगण्यासाठी हे ईव्हीएम मशीनचे पोस्टर आणलं होतं. काल विजयी झाल्यामुळे आमच्या ह्यांनी त्याचीच पूजा केली!!**


पाहिजेत
अहिल्यानगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
कॅशियर
जागा : 4 (पुरुष)
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
सेल्समन
जागा : (पु.)4 /(स्त्री)4
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 14000/- ते 15000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
मोड कारागीर
जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
पगार : 17000/- ते 18000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह शनिवार ते गुरुवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



घर विकणे
अर्जंट दोन मजली राहते घर विकणे (सहा रुम) गुलमोहर रोड, ममता गॅसजवळ, सावेडी
- संपर्क -
7768003126
9890103648



विजयी उमेदवारांचे अभिनंदन
आता चला थायलंड....
4 दिवस फक्त 29,999/-
पुणे ते पुणे विमान
(फेब्रुवारी ५, ११, १२, २६ व मार्च १२, २०)
-: संपर्क :-
ओंकार ट्रॅव्हल्स
प्रोप्रा. नितीन मरकड
लालटाकी, नगर
8237446892



ARISE AWAKE ACHIEVE
"Start your child's educational journey with a beautiful beginning"
Admissions Open
For Nursery, LKG & UKG
For the Year 2026-27
Age Criteria for Admission (2026-27)
Nursery - 1st October 2022 - 31st December 2023
LKG - 1st October 2021 - 31st December 2022
UKG - 1st October 2020 - 31st December 2021
SVES
Ahmednagar Sindhi Education Society's
(Linguistic Minority Educational Trust)
St. Vivekanand English School
(Pre - Primary Section)
Kanwarnagar, Ahilyanagar. Ph. : 0241-2421999/2428866
Mrs. Kanchan Papdeja, Principal
Mr. Gopal Bhagwani, Secretary
Mr. Ramchand Menghani, President



४२ वा वर्धापन दिन
डि.चंद्रकांत
फॅब्रिक्स ॲण्ड मेन्स वेअर
चितळे रोड, अ.नगर
डि चंद्रकांत व मेन्सवेअरच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त
सर्व प्रकारच्या रेडिमेड्स व फॅब्रिक्सवर
25% सुट
सुट फक्त 17 18 19 20 पर्यंत
JANUARY 2026

(पान १ वरुन)

# विजयाची जबाबदारी

वरवर पाहता भाजपा आणि राष्ट्रवादी पक्षांची दिसणारी ही युती प्रत्यक्षात मात्र विखे आणि जगताप यांचीच युती दिसून आली. त्यामुळेच दोन्ही पक्षांचे निर्णय दोघांनी मिळून घेतले. अर्थात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे मार्गदर्शन होतेच. पण या तरुण पिढीने 'लीडिंग फ्रॉम फ्रंट' या उक्तीप्रमाणे संपूर्ण निवडणुकीचे नियंत्रण आपल्याकडे ठेवले. ही जोडी यावेळी विविध माध्यमांमधून चर्चेत राहिली. विधानसभेच्या निवडणुकीपासूनच आ. संग्राम जगताप यांनी महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवली होती. डॉ. सुजय विखे यांना लोकसभेच्या निवडणुकीचे शल्य होतेच. त्यामुळे त्यांनी देखील नगर शहरात विशेष लक्ष घातले. भाजपाच्यावतीने सर्व सूत्रे विखे पिता-पुत्राकडे होती. इतर सर्व पदाधिकारी नाममात्र होते. परंतु विखे यांची स्वतः ची एक मोठी यंत्रणा आहे, प्रशासनावर पकड आहे. भाजपाकडून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे, स्वतः मुख्यमंत्री फडणवीस निवडणुकीवर लक्ष ठेवून होते. त्या तुलनेने राष्ट्रवादी पक्षातर्फे सर्वेसर्वा म्हणून आ. संग्राम जगताप हेच एकमेव होते. गेल्या विधानसभा निवडणुकीत संग्राम जगताप यांनी हॅटट्रिक करत स्वतःचे नेतृत्व कौशल्य सिध्द केलेच, परंतु त्यांचे राजकीय चातुर्यदेखील दिवसेंदिवस प्रगल्भ आणि परिपक्व होत आहे. असे असले तरी विधानसभेची निवडणूक आणि आत्ताची पालिकेची निवडणूक यामध्ये आ. जगताप यांच्यादृष्टीने फार मोठा बदल होता, तो म्हणजे वडील माजी आमदार अरुणकाका जगताप आणि सासरे माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांचे हयात नसणे. राष्ट्रवादीकडून प्रथमच आ. संग्राम जगताप एकटेच किल्ला लढवित होते, हे विशेष! असे असताना देखील राष्ट्रवादीचे सर्वात जास्त नगरसेवक निवडून आणून आ. जगताप यांनी नगर शहरातील वर्चस्व सिध्द केले.

ज्याप्रमाणे फार पूर्वीपासून 'विखे पॅटर्न' संपूर्ण राज्यात प्रसिध्द आहे, त्याचप्रमाणे आ. जगताप यांनी अलिकडच्या काळात स्वतःचा वेगळा असा 'संग्राम पॅटर्न' प्रस्थापित केला आहे. त्याची प्रचिती नगरकरांना विधानसभा निवडणुकीत आली आहे. या दोन पॅटर्नची एकत्र येऊन नगर महापालिकेची निवडणूक हातात घेऊन युतीला विक्रमी बहुमत मिळवून दिले. या संपूर्ण निवडणुकीत आ. जगताप व डॉ. सुजय विखे दोघेही खांद्याला खांदा लागून लढताना दिसले. त्यांचे दुचाकीवरुन फिरणे, मिसळ खात मुलाखत देणे, पॉडकास्ट हे अनेकांना उथळ वाटणारे होते, परंतु त्यामुळे ते दोघे मतदारांच्या चर्चेत राहिले. दोघांनी सुरुवातीपासूनच विशिष्ट स्ट्रॅटेजी ठरवलेली होती. शेवटच्या घटकेपर्यंत एबी फॉर्म जाहीर न करणे, सर्व्हेचे कारण पुढे करत नेमक्या त्याच उमेदवारांना तिकीट देणे, मुकुंदनगर प्रभागात एकही उमेदवार न देणे, उमेदवार असणाऱ्या प्रभागांमध्ये विशेष रणनीती आखत प्रचाराची दिशा ठरवणे, केडगावकरांचा उपद्रव मूल्य संपवणे, या काही त्यातील ठळक बाबी.

नगर शहरावर बराच काळापासून भाजपा-सेना (एकत्रित) या पारंपरिक युतीचे वर्चस्व होते. असे असले तरी स्वतःच्या पदरात जास्त जागा घेणे, एकाही मोठ्या नेत्याची जाहीर सभा न घेता उमेदवारांशी थेट संपर्क ठेवत प्रभागानुसार रणनीती ठरविणे ही आ. संग्राम जगताप यांची ठळक वैशिष्ट्ये. त्यामुळे आ. संग्राम जगताप यांचे विशेष कौतुक!

या निवडणुकीत आ. जगताप व माजी खा. सुजय विखे, दोघांच्या दृष्टिकोनात एक महत्वाचा फरक जाणवला. तो म्हणजे आ. जगताप भविष्यातील २०२९ ची विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून शहरात प्राबल्य ठेवण्याच्या प्रयत्नात दिसत होते, तर डॉ. सुजय विखे आपल्या पराभवाची परतफेड करण्यामागे होते. त्याची प्रचिती प्रभाग १५, १६ आणि १७ मध्ये पहावयास मिळाले. त्यामुळे आ. जगताप यांचा दृष्टिकोन भविष्याकडे होता, तर विखे भूतकाळातच दिसत होते. त्यामुळे पक्षातील सर्व जुन्या आणि निष्ठावानांना निवडणूक प्रक्रियेबाहेर ठेवत त्यांनी सर्व सूत्रे स्वतःकडे ठेवली. परंतु निष्ठावंतांच्या नाराजीचा फटका बसू नये म्हणून खुद्द पालकमंत्र्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. स्वतः शेवटचे सात दिवस नगरमध्ये ठाण मांडून होते.

एकंदर काय भाजप-राष्ट्रवादी युतीच्या या बलाढ्य विजयाचे श्रेय आ. जगताप आणि मा. खा. सुजय विखे या जय-वीरु जोडीला नक्कीच जाते त्याबद्दल दोघांचे अभिनंदन!

ही एक बाजू असली तरी यावेळच्या निवडणुकीची दुसरी बाजूदेखील लक्षात घेण्यासारखी आहे. निवडणूक उमेदवार केंद्रित होती, मतदार केंद्रित कुठेही दिसून आली नाही. मतदारांना गृहित धरण्यात आल्याचे मोठ्या प्रमाणात जाणवले. बिनविरोध निवडणूक हा त्याचाच भाग! प्रभागांमध्ये उमेदवार आमच्यापर्यंत पोहोचलेच नाहीत, अशी मतदारांची मोठ्या प्रमाणात तक्रार आहे. मतदानाची घसरलेली टक्केवारी ही मतदारांची उदासीनता दर्शवते. सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे लक्ष्मीदर्शनाचा. या निवडणुकीत सर्वच प्रभागात लक्ष्मीदर्शन नको तितक्या प्रमाणात झाल्याची चर्चा आहे. जाहीर प्रचारापेक्षा लक्ष्मीदर्शन हेच प्रभावी माध्यम अनेक उमेदवारांकडे दिसून आले. काही ठिकाणी तर निवडून आल्यानंतर पुन्हा लक्ष्मीदर्शनाची हमी देण्याची व्यवस्था काही उमेदवारांनी केल्याची चर्चा आहे. या लक्ष्मीदर्शनात सुशिक्षीत मतदार देखील आता सहभाग घेत आहेत हे दुर्दैव!

त्याचबरोबर गुंडगिरी आणि दहशत देखील यावेळी अधिक पहावयास मिळाली. स्वत: पैसे वाटल्यानंतर इतरांना पैसे वाटू न देणे, बनावट ओळखपत्र तयार करणे हा त्याचाच एक भाग. मतदानाच्या दिवशी दुपारपर्यंत संथगतीने चाललेले मतदान अचानक शेवटच्या दोन तासात उसळी घेते, यामागचे गुपीत सर्वश्रुत आहे. हे सर्व पाहता लोकशाही नक्की कुठे चालली आहे, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो.

आज जरी युतीला मोठे बहुमत मिळाले असले तरीही यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आश्वासक चेहरा आणि मतांचे ध्रुवीकरण हे कुठेही नाकारता येणार नाही. त्यामुळे निवडून आलेल्यांवर मोठी जबाबदारी आहे. केंद्र, राज्य आणि आता शहरात समविचारी पक्षांची सत्ता आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्याची धोरणं लक्षात ठेवणं तितकचं गरजेचं आहे. त्याचबरोबर शहराच्या बदललेल्या नावाप्रमाणे 'अहिल्याबाई'च्या कर्तृत्वाला आणि प्रतिभेला साजेसं असं शहर निर्माण करणं हे सर्व नगरसेवकांचं आद्य कर्तव्य आहे. तशी घोषणा देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी नगरच्या सभेत केलेली आहे. या निवडणुकीत विकासाचा मुद्दा जरी प्रामुख्याने आलेला असला तरीही अजून अनेक मूलभूत समस्या प्रलंबित आहेत. रस्ते दिसतात, परंतु अमृत योजना, फेज-२, भुयारी गटारी या न दिसणाऱ्या गोष्टींना मूर्तस्वरुप देण्याची जबाबदारी या नवनिर्वाचित नगरसेवकांवर आहे. तसेच वाढीव पाणीपट्टीचा प्रश्न ऐरणीवर आहे. त्याचबरोबर पालिकेचे उत्पन्न वाढवताना थकबाकी वसुलीवर लक्ष द्यावे लागणार आहे. निवडून आलो म्हणजे मिळवलं हे होणे योग्य नाही.

त्या पार्श्वभूमीवर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले विधान अत्यंत महत्वपूर्ण आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक विजयाचे स्वागत नक्कीच करायचे आहे. परंतु त्या विजयाचा उन्माद होऊ नये ही जबाबदारी प्रत्येक लोकप्रतिनिधीने सांभाळायची आहे. असे झाले तरच खऱ्याअर्थाने शहराचा विकास होईल. नवनिर्वाचित सर्व नगरसेवक ही जबाबदारी उचलतील ही आशा! सर्व नगरसेवकांचे अभिनंदन!

# वक्त ने किया क्या हसी सितम....



सर्वगुण संपन्न राहू शकत नाही हे खरे असले तरी किमान चांगले राहण्याचा विचार व्हावा ना!

उम्रभर कौन किसको याद करता है।

वक्त के साथ साथ खयालात भी बदल जाते है

शायरने किती छान, मार्मिकपणे सांगितलय.

ट्रेजेडी किंग गुरुदत्त व वहिदाजींवर चित्रीत आत्म जागरण करणारं गाणं ऐकण्यात, पाहण्यात आलं आणि मन तत्ववादी, राजकीय व आध्यात्मिक दृष्टीने काहींसा विचार करु लागले.

खरंय, काय होता व असतो मनुष्य. विचार, आचार व व्यक्त होण्याची शक्ती देवाने दिली अन् सृजनशील माणूस अनंताचा शोध घेता घेता बदलू लागला. संवेदनशील रसिकांनाही जीवनासह, मानवी स्वभावाच्या संशोधनाची गोडी लागली. पण आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तो आचार विचारांनी बदलत जातो. म्हणूनच हळवा कवी म्हणतो,

वक्त ने किया क्या हंसी सितम
तुम रहे ना तुम, हम रहे ना हम...

सत्युगातला माणूस द्वापार त्रेतायुगातून कलियुगात आला आणि त्याचे वागणे अधिकच विचित्र झाले. स्वार्थांधाता इतकी पराकोटीला पोहोचली आहे की त्यापोटी अनीती, अनाचार, भ्रष्टाचार, पैशाचा माज, दहशतीचा वापर हा प्रकार सर्व जगातच वाढत चालला आहे. शक्तीशाली अमेरिकेचे अध्यक्ष अधिक मोठा, सर्व शक्तीमान होण्यासाठी अन्य देशांना येने केन मार्गाने त्रास देतात. वैयक्तिक पातळीपासून देश-जागतिक स्तरावर अत्यंत भयानक परिस्थिती झाली आहे. चिंता आहे की ती अधिक स्फोटक बनू शकते. नीतीमत्तेचे विदीर्ण अंधःपतन सर्वनाश करेल यात शंका नाही. अर्थात कलियुगात हे वाढतच जाणार कारण तुम रहे ना तुम... हम रहे ना हम...

आपण सर्वसामान्य माणूस सदासर्वकाळ, खयालात, ख्वाब बदलणं समजू शकतो पण विवेक, नैतिकता हे तर जीवनाचे अधिष्ठान असते ना?

शीर्षक गीत अधिक भावले कारण आजची सामाजिक, राजकीय परिस्थिती! विशेषतः राजकीय वातावरण प्रचंड विचित्र, असंतोषाचे बनलेले आहे. सत्ता, संपत्तीच्या अभिलाषेने टोकाचे स्वरुप धारण केलेले असून आपल्या विरोधकाविषयी साम, दाम, दंड, भेद वापरण्याची चढाओढच आहे जणू! काल एका पक्षातील आज दुसऱ्याच पक्षात जातो व तिसऱ्याच तिकीटावर उभा राहतो! निष्ठावान कार्यकर्त्यांना कोणी विचारायला तयार नाही. 'विनींग मेरीट'च्या नावाखाली पक्ष काम करु लागले. पैशावाल्या व बाहुबलीच्या साथीला कार्यकर्ते राहायला लागले.

दृष्टीक्षेप
मुसाफिर

काळ बदललाय. वक्त ने सितम केल्याने सगळेच बदलताहेत. अहो अगदी सामान्यांनाही मतदानास लक्ष्मी दर्शनाची आस असते. असो.

'कालाय तस्मै नमः।' हा लेख तुम्ही वाचाल तोपर्यंत निकाल लागलेले असतील. कही खुशी कही गम वातावरण असेल. सगळे मिळून, झाले गेले विसरुन नव्याने अहिल्यानगरीला महानगरी बनवण्यास प्रयत्न करु. सत्ताधारी व विरोधक मिळून नगरकरांच्या प्रगती, शांततेसाठी प्रयत्न करतील अशी आशा ठेवूया. शेवटी जीवन आशेवरच चालते ना?

**- किशोर गांधी,**
**दिशान फिचर्स.**




## राशीभविष्य

- **मेष** : संकल्पपूर्तीसाठी अनुभवींचा सल्ला घ्या. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **वृषभ** : आर्थिक निर्णय घाईगडबडीत घेऊ नका. विरोधकांच्या कारवायांबाबत सावध रहावं. संयम बाळगावा.
- **मिथुन** : मतभेद वा गैरसमज दूर होतील. गुंतवणुकीचा विचार तुर्तास दूर ठेवा. आर्थिक स्थिती बरी राहील.
- **कर्क** : कौटुंबिक बाबतीत मनस्ताप संभवतो. जबाबदाऱ्या योग्य रितीनं पूर्ण कराव्या. प्रवास शक्यतो टाळा.
- **सिंह** : कामातील सातत्य गरजेचे ठरेल. उत्साहवर्धक घटना घडतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **कन्या** : प्रलंबित कामांना गती येईल. मोठ्या व्यवहारात तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **तूळ** : कार्याबाबत उत्साह राहील. मित्रमंडळीत आर्थिक व्यवहार टाळावेत. पित्ताच्या विकारात काळजी घ्या.
- **वृश्चिक** : कौटुंबिक मतभेद त्रासदायक ठरतील. गुंतवणुकीत अनुकूलता राहील. थोरामोठ्यांचा सल्ला घ्यावा.
- **धनु** : कोणावर टीका करणं टाळावं. वेळ आणि कामाचं योग्य नियोजन करावं. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.
- **मकर** : आत्मविश्वासपूर्वक वाटचाल सुरू राहील. कार्यक्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या येतील. बाकी चिंता नको.
- **कुंभ** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. नव्या कामांबाबत उत्साह राहील. स्थावर बाबतीत दिलासा मिळेल.
- **मीन** : मनाजोग्या संधी प्राप्त होतील. व्यक्तिगत बाबतीत कमी बोलावं. प्रियजनांचा सहवास लाभणार आहे.


## १८ जानेवारी

दिनविशेष

- **१९६७** : क्रांतिकारक, कृषीतज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचं निधन.
- **२०१३** : वाहतुकीला अडथळा आणणारा कोणताही पुतळा उभारण्याची अथवा बांधकामाची परवानगी न देण्याचे केंद्राचे राज्य सरकारांना निर्देश.
- **२०१४** : ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर यांची 'द वर्ल्ड पोस्ट' या ऑनलाइन संकेतस्थळाच्या संपादकीय मंडळावर नियुक्ती.
- **२०१५** : अन्नसुरक्षा अभियानात सरसकट सर्व कुटुंबांचा समावेश करण्याचा आघाडी सरकारचा निर्णय भाजप सरकारनं रद्द केला.

## आरोग्यमंत्र: खा ओला हरभरा

सध्या बाजारात हिरवे हरभरे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. ते प्रथिने, कार्बोहायड्रेट, फायबर, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे यांसारख्या पोषक तत्त्वांचा चांगला स्रोत असतात. ओले हरभरे खाल्ल्यामुळे हिवाळ्यात शरीराची कमी होणारी प्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे सर्दी, ताप यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका कमी होतो. हिरवा हरभरा शरीराचे वजन वाढवतो. यामध्ये असणारे फोलेट मूड स्विंग, चिंता आणि नैराश्य टाळते.



✻ हिरवे हरभरे फायबरचा चांगला स्रोत आहे. फायबरच्या कमतरतेमुळे पचनक्रिया बिघडते आणि चरबी झपाट्याने वाढू लागते. फायबरमुळे बद्धकोष्ठता आणि पचनाशी संबंधित समस्या दूर होतात आणि चरबी लवकर कमी होते. ✻ हरभऱ्याचे सेवन केल्याने शरीरात ब्युटीरेट नावाचे संयुग तयार होते जे कर्करोगाच्या पेशींचा वाढता धोका कमी करण्यास मदत करते. यासोबतच हरभऱ्यामधील फोलेट आणि व्हिटॅमिन बी ९ मूड स्विंग्सवर प्रभाव दाखवतात. यासोबतच ते चिंता आणि नैराश्याशी लढण्यास मदत करते. ✻ हरभऱ्याच्या सेवनाने हृदय निरोगी राहते. यामधील मॅग्नेशियम आणि पोटॅशियम रक्तदाब नियंत्रणात ठेवते. यासोबतच यातील प्रोटीनमुळे केसांच्या वाढीवरही उत्तम परिणाम होतो. हे केसांची चमक टिकवून ठेवते आणि केस गळणे टाळते. हरभरा, हिरव्या भाज्या मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहेत.

## कोण होणार? व्हा युआय, युएक्स तज्ज्ञ

वेबसाईट तयार करताना बरीच मेहनत हे काम डिझायनर्स करतात. त्यांना 'यूआय' किंवा 'यूएक्स' डिझायनर्स असं म्हणतात. ही मंडळी ॲप्स आणि साईट्स तयार करतात. या क्षेत्रात सध्या खूप संधी आहेत.

यूआय डिझायनर्स वेबसाईट्स तसंच ॲप्सच्या रंगरुपावर लक्ष केंद्रित करतात. यासोबतच ग्राफिक्स, रंगसंगती आणि त्याचा लोकांवर पडणारा प्रभाव याचाही विचार त्यांना करावा लागतो तर यूएक्स डिझाइनची उपयुक्तता, अनुभव आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने काम करतात. यासाठी त्यांना लोकांचा दृष्टिकोन, आवड जाणून घ्यावी लागते. यात कारकिर्द घडवायची असेल तर यूआय आणि यूएक्स किंवा इंटरॅक्शन डिझाइनमध्ये प्राविण्य मिळवून डिझायनिंगमध्ये पदवी मिळवू शकता. त्यासाठी तुम्हाला 'ॲडोब फोटोशॉप', 'कोरल ड्रॉ', 'इनडिझाइन'सारख्या सॉफ्टवेअरची माहिती असायला हवी. यासोबतच एचटीएमएल, एक्सएमएल, सीएसएस, जावाचं ज्ञान असेल तर खूपच छान. नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ डिझाइन,अहमदाबाद, इंडस्ट्रीअल डिझाइन सेंटर, मुंबई, एनआयएफटी, दिल्ली, यासारख्या संस्थांमधून तुम्ही याचं शिक्षण घेऊ शकता.

## मेक अप मंत्रा: खोट्या पापण्या की लॅश एक्सटेंशन?

बरेचदा आपल्याला कृत्रिम पापण्यांचा आधार घ्यावा लागतो. या खोट्या पापण्या आपल्या पापण्यांवर चिकटवता येतात. दुसरा पर्याय म्हणजे आयलॅश एक्सटेंशन. यात नैसर्गिक पापण्यांवर एक-एक पापणी चिकटवून त्यांची लांबी वाढवली जाते. असं असताना खोट्या पापण्या चिकटवायच्या की आयलॅश एक्सटेंशनचा पर्याय निवडायचा या प्रश्नाचं जाणून घेऊ या.

✻ काही दिवसांच्या सरावाने खोट्या पापण्या चिकटवण्याची कला तुमच्या अंगवळणी पडेल. दुसरीकडे आयलॅश एक्सटेंशनसाठी एखाद्या व्यावसायिकाची मदत घ्यावी लागेल. त्या तुमच्या नैसर्गिक पापण्यांवर एक-एक करुन चिकटवल्या जातात. खोट्या पापण्या एका मिनिटात चिकटतात तर लॅश एक्सटेंशनच्या प्रक्रियेला एक ते दोन तास लागू शकतात. ✻ खोट्या पापण्या अगदी सहजपणे उपलब्ध आहेत. मेक अप स्टोअर किंवा ई कॉमर्स वेबसाईटवरून तुम्हाला ही खरेदी करता येईल. त्यांच्या किंमतीही फार नसतात. पण मस्कारा वापरत असाल तर तो काढताना नाजूक पापण्या तुटण्याची भीती असते. (क्रमशः)

## पंचांग

**रविवार, १८ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. १५, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : हर्षण,
सूर्योदय ७.१७, सूर्यास्त ६.२१

## फॉरवर्डस

**जिसें अपनीं धून मिल ग़यी उसें...**

**दुनियाँ क़ी तालियाँ नहीं चाहियें...!**

## वेगळ्या वाटा

नॅसकॉमच्या अहवालानुसार देशात १०० पेक्षा जास्त कंपन्या गेम डेव्हलपमेंटशी संबंधित आहेत. युवा मंडळी गेमिंगच्या क्षेत्रात करीअरच्या वाटा शोधू शकतात.

**गेम डिझायनर**

गेमची संकल्पना ही गेम डिझायनरची असते. नियम ठरवण्यापासून गेमचं कथानक गुंफण्यापर्यंतची अनेक कामं ही मंडळी करतात. गेम डिझायनिंगचं प्रशिक्षण घेतल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात उडी घेऊ शकता. कॉम्प्युटर इंजिनिअर्स किंवा कॉम्प्युटर सायन्समध्ये बी टेक करूनही गेम डिझायनर म्हणून काम करता येतं. (क्रमशः)

## भटकंती: दिल्ली परिसरात फिरायचंय?

दोस्तांनो, देशाची राजधानी असणाऱ्या दिल्लीबाबत तुम्हालाही आकर्षण वाटत असेल. त्यादृष्टीने दिल्लीला भेट देतानाच परिसरात फिरण्याची योजना असेल तर बाईक ट्रिपचा आनंद लुटू शकता. दिल्लीच्या आसपास असणाऱ्या ठिकाणांना भेटी देऊ शकता. मित्रमंडळींची गँग सोबत असेल तर बाईक काढा आणि या गुलाबी थंडीत फिरायला बाहेर पडा.



✻ तुम्ही गडमुक्तेश्वरला जाऊ शकता. राष्ट्रीय महामार्ग २४ वरून हापुडच्या दिशेने चला. हा रस्ता सुस्थितीत आहे. शिवाय या भागात वाहतुकीची कोंडीही होत नाही. या रस्त्यावर खाण्यापिण्याची बरीच ठिकाणं आहेत. इथल्या धाब्यावर पंजाबी जेवणाचा आनंद लुटता येईल.

✻ तुम्ही अलवरला निघू शकता. इथला रस्ता फार चांगला नाही. त्यामुळे बाईक सांभाळून चालवा. अलवरपासून सवाई माधोपूर आणि पुढे उदयपूरला जाता येईल.

✻ दिल्लीहून जयपूरला जाता येईल. हा रस्ता थोडा खराब आहे. या रस्त्यावर पंजाबी आणि राजस्थानी जेवण मिळेल. सीकर रोड परिसरात चांगले धाबे आहेत. इथे स्वादिष्ट भोजन करता येईल. जयपूरला बरीच खरेदी करता येईल. या परिसरात बरीच पर्यटनस्थळंही आहेत. तुम्ही गडकिल्ल्यांनाही भेटी देऊ शकता.

## खेचाखेची: काय करणार?

एटीएम मधून पैसे काढल्यानंतर जे लोक पैसे मोजून बघतात...

.

त्यांना माझा एक साधा प्रश्न आहे...

.

.

.

.

पैसे कमी निघाले तरी तुम्ही काय करणार आहात?

## वेगळं काही

पृथ्वीवरच्या सर्वात धोकादायक ठिकाणांमध्ये 'बर्म्युडा ट्रँगल' आणि 'एरिया ५१' चं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. 'बर्म्युडा ट्रँगल' भागात विमानं आणि जहाजं गायब होतात. पण अमेरिकेतलं 'नेवाडा ट्रँगल' अधिक धोकादायक आहे. या भागावरून गेलेलं एकही विमान आजवर परतलेलं नाही. एका अहवालानुसार गेल्या ६० वर्षांमध्ये इथून दोन हजारपेक्षा जास्त विमानं गायब झाली आहेत. त्यातले प्रवासी तसंच कर्मचाऱ्यांचा काहीच पत्ता लागलेला नाही. 'नेवाडा ट्रँगल' परिसरातली विशिष्ट शक्ती विमानांना आपल्याकडे खेचून घेते असं म्हटलं जातं. पण ही शक्ती कोणती? यामागचं शास्त्रीय कारण काय? याचं गुपित शास्त्रज्ञांना उलगडता आलेलं नाही. (क्रमशः)

## स्टाईल स्टेटमेंट: वापरा ट्रेंडी बॉटम्स



मैत्रिणींनो, सध्या विविध प्रकारच्या बॉटम्सचा ट्रेंड आहे. एकापेक्षा एक हटके बॉटम्स खूप छान दिसतात. यामुळे एकच कुर्ती वेगवेगळ्या स्टाईलने कॅरी करता येते. ऑफिस असो किंवा लग्न समारंभ, या ट्रेंडी बॉटम्स तुम्ही कुठेही कॅरी करू शकता. कुर्तीवर घालता येण्यासारखे बॉटम्सचे विविध पर्याय...

✻ सध्या धोती पँटची क्रेझ आहे. कुर्तीला साजेशी धोती पँट शिवून घेता येईल. तयार धोती पँटचा पर्यायही आहे. या पँटवर लाँग किंवा शॉर्ट कुर्ती घालता येईल. यावर अनारकली स्टाईल शॉर्ट कुर्ती खूप छान दिसेल. ✻ ट्राउजर स्टाईल पँटचा ऑप्शनही आहे. अशा पँटमध्ये तुम्हाला खूप आरामदायी वाटतं. आपली आवड आणि कंफर्टचा विचार करून ट्राउजर पँट शिवून घेता येतील. ✻ स्टायलिश आणि ट्रॅडिशनल लूकसाठी कुर्तीसोबत शरारा घालता येईल. यावर लाँग किंवा शॉर्ट यापैकी कोणतीही कुर्ती घालता येईल. ✻ पलाझोचा ट्रेंडही जोरात आहे. डिझायनर कुर्त्यावर प्लेन पलाझो घालता येईल. फॉर्मलवेअर म्हणून पलाझो आणि कुर्ती कॅरी करता येईल.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ पान ३




## अर्ज़ किया है...

*बोल कि लब आज़ाद हैं तेरे,*
*बोल ज़बाँ अब तक तेरी है।*

**- फ़ैज़ अहमद फ़ैज़**

फ़ैज़ अहमद फ़ैज़ यांच्या या ओळी माणसाला आपली भीती झटकून सत्य बोलण्याची ताकद देतात. शायर म्हणतात की, अजूनही आपली जीभ आपल्याच ताब्यात आहे. म्हणजेच अन्याय, दडपशाही किंवा भीती असली तरी बोलण्याचा, प्रश्न विचारण्याचा हक्क तुझ्याकडून कुणी हिरावून घेतलेला नाही. ही शायरी माणसाला जागं करते, आणि सत्य, हक्क व स्वातंत्र्यासाठी निर्भयपणे बोलायला प्रेरणा देते.

## खरी ताकद स्थिरता!



**मागील दोन वर्षांचा गुंतवणुकीचा आढावा घेतल्यास बाजार तेजीत असताना बोलबाला असलेले स्मॉल व मिडकॅप म्युच्युअलफंड अथवा शेअर्स यांनी परताव्याच्या बाबतीत निराशा केलेली दिसते. याउलट लार्जकॅप म्युच्युअलफंड अथवा मल्टी असेटफंडांनी मात्र दमदार कामगिरी केलेली दिसते. गुंतवणुकीत विविधता ठेवताना बरेचसे गुंतवणूकदार नेमकी हीच गोष्ट विसरतात आणि त्यांच्याकडे ज्यावेळी पैसा उपलब्ध असेल त्यावेळी बाजारात तेजी चालू असेल तेथेच गुंतवणूक करून जास्त परतावा कमाविण्याचा प्रयत्न करतात. दीर्घकालीन गुंतवणूक करताना सहसा स्मॉल अथवा मिडकॅप फंडांना वाजवीपेक्षा जास्त महत्व दिले जाते. काही प्रमाणात यामध्ये तथ्य**




**असले तरी दीर्घकालीन म्हणजेच किमान सात ते दहा वर्ष हा कालावधी मात्र गुंतवणूकदार सोयीस्करपणे विसरतो. स्मॉल व मिडकॅप फंडांचे महत्त्व परताव्यासाठी असले तरी लार्ज कॅप अथवा मल्टीअसेट किंवा बॅलन्स फंडांचे महत्त्व गुंतवणुकीच्या स्थिरतेसाठी आहे हे निर्विवाद सत्य आहे. त्यामुळे त्यातून मिळणारे सरासरी १२- १३% नफ्याची सरासरीची तुलना इतर बाबींशी करता येणार नाही.**

**अमेरिका- भारत व्यापार वाटाघाटींमध्ये अडथळे येत असले तरी भारत आणि युरोपियन युनियन मधील मुक्त व्यापार करार २७ जानेवारीपर्यंत अंतिम स्वरूपात येऊ शकेल. युरोपियन युनियन हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असून मागील आर्थिक वर्षात या द्विपक्षीय व्यापारात १३६ अब्ज डॉलर्स एवढी उलाढाल होती. या व्यापार करारात इतर सर्व पैलूंचा समावेश असला तरी दोन्ही बाजूंच्या संवेदनशील कृषी मुद्द्यांना चर्चेतून बाहेर ठेवण्यात आले आहे. गुंतवणूकदारांनी दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी गुंतवणूक करताना एसबीआय, सीडीएसएल, एचएएल ,एल अँड टी यासारख्या ब्लूचिप कंपन्यांच्या शेअर्सकडे स्वतःची जोखीम समजावून घेऊन लक्ष ठेवावे.**

**- राजेश देशपांडे**
**देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर**
**M.9850724890**

# नोटाला पसंती; सावेडीत नोटांची मते जास्त
# १८ हजार ३४९ मतदारांनी नाकारले उमेदवारांना!

**समाचार/नगर-दि.१७**

महापालिका निवडणुकीत यंदा तब्बल १८ हजार ३४९ मतदारांनी नोटाला पसंती दिली. त्यामुळे या मतदारांना एकही उमेदवार योग्य वाटला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.




महापालिका निवडणुकीसाठी शहरात गुरूवारी मतदान झाले. ३ लाख ७ हजार ९ मतदारांपैकी १ लाख ९७ हजार ५५५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ६४.३५ टक्के एवढी मतदानाची नोंद झाली. मागील निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदानाची टक्केवारी घसरली. निवडणुकीची काल, शुक्रवारी मतमोजणी होऊन निकाल जाहीर झाला. निकालात १८ हजार ३४९ मतदारांनी उमेदवारांना नाकारल्याचे दिसून आले आहे. सावेडीतील प्रभाग १ अ मध्ये सर्वाधिक ६७१ मते नोटाला मिळाली आहेत. प्रभाग २ मध्ये सर्वात जास्त २१८५ मते नोटाला मिळाली आहे. त्याखालोखाल प्रभाग १ मध्ये १९७३ मते नोटाला पडली आहे. सर्वांत कमी मते मुकुंदनगर येथील प्रभाग क्रमांक ४ मध्ये असून ती संख्या ४३६ इतकी आहे. प्रभाग निहाय नोटाला मिळालेली मते कसांत अशी– प्रभाग १ (१९७३), प्रभाग २ (२१८५), प्रभाग ३ (८८२), प्रभाग ४ (४३६), प्रभाग ५ (१०२६), प्रभाग ६ (५५६), प्रभाग ७ (९००), प्रभाग ८ (७८३), प्रभाग ९ (१३००), प्रभाग १० (९९७), प्रभाग ११ (१३५४), प्रभाग १२ (८००), प्रभाग १३ (१५४९), प्रभाग १४ (९०७), प्रभाग १५ (९८४), प्रभाग १६ (१०३३), प्रभाग १७ (७९४)

### अजितदादांनी घेतली खा. शरद पवारांची भेट
# जिल्हा परिषद निवडणुका दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार!

**समाचार/बारामती-दि.१७**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादीचा मोठा पराभव झालेला असतानाच आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत खा. शरद पवार यांची भेट घेतल्याने राजकीय निरीक्षकाच्या भुवया उंचावल्या आहेत. दोन्ही नेत्यांच्या सुमारे तासभर झालेल्या भेटीत आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका दोन्ही पक्षांनी एकत्रित लढविण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. शरद पवार राष्ट्रवादीचे खा. अमोल कोल्हे आणि प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी त्यास दुजोरा दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. या दोन्ही महापालिकांमध्ये भाजपविरोधात ताकदीने लढण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीची युती झाली होती. मात्र पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये भाजपाने मोठा विजय मिळविला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दोन्ही ठिकाणी धक्कादायक पराभव पत्करावा लागला. राजकीय वर्तुळात याबाबत चर्चा सुरू असतानाच आज सकाळी उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामतीत खा. शरद पवार यांची भेट घेत सुमारे तासभर चर्चा केली. त्यामध्ये राज्यातील जाहीर झालेल्या १२ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका दोन्ही पक्षांनी एकत्रित लढविण्याबाबत चर्चा झाली. यावेळी खा. सुप्रिया सुळे, खा. अमोल कोल्हे, ज्येष्ठ नेते आ. जयंत पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, आ. रोहित पवार आदी उपस्थित होते.शरद पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे आणि खा. अमोल कोल्हे यांनी ही चर्चा झाल्याचे सांगितले. या चर्चेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी मंत्री दत्ता भरणे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आदी नेते उपस्थित होते.

### आ. जगताप, डॉ. विखे यांनी साजरा केला युतीचा विजय
# विकासाला साथ देत नगरकरांचा युतीलाच कौल-आ. जगताप





**समाचार/नगर-दि.१७**

महानगरपालिका निवडणुकीत शहरातील नागरिकांनी युतीला स्पष्ट बहुमत दिले आहे. विकासाच्या मुद्यांवर लढवलेली ही निवडणूक युतीने एकहाती जिंकली आहे. नगरकरांनी विकासाला साथ देऊन योग्य कौल दिला आहे. नगर वासियांना विकासच हवा आहे. आता मनपात युतीचीच सत्ता आल्याने भविष्यात शहर विकासाची गाडी अधिक वेगाने धावणार आहे. शहर विकासासाठीच मी व डॉ.सुजय विखे कायम कटीबद्ध राहू, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले. मनपा निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजपा युतीने तब्बल ५२ जागा मिळवल्यानंतर आ.संग्राम जगताप व माजी खासदार डॉ.सुजय विखे यांनी प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले. तसेच आ.संग्राम जगताप यांनी महानगरपालिकेमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास, तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून त्यांच्या चरणी हा विजय अर्पण केला. यावेळी शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दामोदर बठेजा, सुमित कुलकर्णी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# मनसेला अपेक्षित यश न मिळाल्याचे दुःख पण..
# खचून जाणाऱ्यातले आपण नाही- राज ठाकरेंची प्रतिक्रिया

**समाचार/नगर-दि.१७**

राज्याचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपा – शिंदेसेना महायुतीने घवघवीत यश मिळविले. या निवडणुकीत ठाकरेसेना – मनसे युतीला धक्कादायक पराभवाचा सामना करावा लागला. निवडणूक निकालानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे काय बोलणार, याची राजकीय वर्तुळात उत्सुकता होती. आता राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करीत निवडणूक निकालावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. या निवडणुकीत मनसेला अपेक्षित यश न मिळाल्याचे दुःख आहे, पण या निकालाने खचून जाणाऱ्यातले आपण नाही, असे राज ठाकरे यांनी त्यामध्ये म्हटले आहे.

ही निवडणूक सोपी नव्हती. अचाट धनशक्ती, सत्तेची शक्ती विरुद्ध शिवशक्ती अशी ही लढाई होती. पण अशा लढाईत सुद्धा आपल्या दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्तम झुंज दिली, त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे सांगतानाच या निवडणुकीतील मनसेच्या अपयशावरही राज ठाकरे यांनी भाष्य केले आहे. मनसेला अपेक्षित यश मिळाले नाही, याचे दुःख आहे. पण म्हणून खचून जाणाऱ्यातले आपण नाही. आपले जे नगरसेवक निवडून आले आहेत, ते तिथल्या सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील. आपली लढाई मराठी माणसाची, मराठी भाषेची, मराठी अस्मितेसाठीची आणि समृद्ध महाराष्ट्रासाठीची लढाई आहे. ही लढाई हेच आपले अस्तित्व आहे. अशा लढाया दीर्घकालीन असतात, याचे भान तुम्हा सर्वांना आहे, अशा शब्दात राज ठाकरे यांनी निवडणूक झाली तरी मराठीची लढाई सुरूच राहील, असे सूचक विधान केले आहे. आपण लवकरच भेटू, पुन्हा कामाला लागू आणि नव्याने आपला पक्ष, संघटना उभारू, असेही राज ठाकरे यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### भाजपा कार्यालयात विजयाचा जल्लोष
# भाजपाचा विजय नगरवासियांना अर्पण - मोहिते



**समाचार/नगर-दि.१७**

शहराच्या नामांतरानंतर झालेल्या पहिल्याचा महानगरपालिकेच्या निवडणुकीत शहरातील जनतेने भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या पदरात न भूतो असे यश प्रचंड यश टाकले आहे. भाजपाला २१ तर राष्ट्रवादीला २७ जागा मिळाल्याने युतीची सत्ता मनपात प्रस्थापित होणार आहे. भाजपाचा हा मोठा विजय असून हा विजय स्वीकारता ज्यांनी भाजपची पायाभरणी केली असे स्व. राजाभाऊ झरकर, बंडोपंत कुलकर्णी, प्रभाकर दसरे, दिलीप गांधी यांच्यासह स्व.गोपीनाथ मुंढे व स्व.प्रमोद महाजन यांचे स्मरण होत आहे. अहिल्यानगर वासीयांच्या आशीर्वादानेच हा एवढा मोठा विजय युतीला मिळाला असल्याने हा विजय मी अहिल्यानगर वासियांना अर्पण करत आहे, असे प्रतिपादन भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने तब्बल २५ जागा जिंकून एक नवा इतिहास रचला आहे. या विजयाचा जल्लोष लक्ष्मीकारंजा चौकातील भाजप कार्यलयात शहर भाजपच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी गुलालाची उधळण करून व जोरदार घोषणाबाजी करून विजयोत्सव साजरा केला.

अनिल मोहिते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी विकासाची घोडदौड चालवली आहे अशीच विकासाची घोडदौड आता अहिल्यानगरमध्ये चालणार आहे. या विजयाचे श्रेय पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ.संग्राम जगताप व माजी खासदार डॉ.सुजय विखे यांना जात आहे. ही निवडणुक लढवताना जी आश्वासने दिली ती प्राधान्याने पूर्ण करणार आहोत. भाजपच्या संघटनात्मक एकजुटीचा हा विजय आहे. प्रत्येकाला योग्य संधी भविष्यात मिळणार असल्याने सर्वांनी श्रद्धा व सबुरी ठेवावी. यावेळी शहर जिल्हा सरचिटणीस महेश नामदे व अशोक गायकवाड, गीता गिल्डा, ज्योती दांडगे, प्रिया जाणावे, बाबासाहेब सानप, दामोदर बठेजा, कालिंदी केसकर, छाया राजपूत, अजिंक्य गुरावे, रेखा मैड, गोकुळ काळे, ज्ञानेश्वर धिरडे, सुनील तावरे, महावीर कांकरिया, संतोष गांधी, श्रीगोपाल जोशी, अशोक सोनवणे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# निवडणूक निकालानंतर नालेगावात वादावादी; चौघांविरूध्द गुन्हा

**समाचार/नगर-दि.१७**

महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर नालेगावमध्ये चांगलाच राडा झाला. कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीतून वादावादी झाल्याने नालेगाव परिसरात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काल, दि. १६ रोजी महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. त्यानंतर प्रभाग ११ मधील विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी जल्लोष केला. तसेच भाजप पराभूत उमेदवाराच्या कट्टर समर्थकाच्या घरासमोर जावून विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी जल्लोष करत घोषणाबाजी केली. दोन्ही उमेदवारांचे समर्थक आमने- सामने आल्याने नालेगावमध्ये काही वेळ तणाव निर्माण झाला. याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली होती. पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्या ठिकाणी चार जण एकमेकांच्या अंगावर धावून जात वादावादी करत असल्याचे पोलिसांना दिसून आले. या प्रकरणी पोकॉ सूरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### आ. तांबे यांचा युवा नेत्यांना टोला
# अपयशाचे खापर निवडणूक प्रक्रियेवर नको

**समाचार/नगर-दि.१७**

राज्यातील महापालिका निवडणुकांचे निकाल समोर येत असताना काही विरोधी पक्षांतील युवा नेते आपल्या अपयशाचे खापर थेट निवडणूक प्रक्रियेवर फोडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सत्यजीत तांबे यांनी अप्रत्यक्षपणे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्यावर निशाणा साधत आहेत का? असा स्पष्ट टोला लावताना जाणवत आहे.



आमदार तांबे यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, महापालिका निवडणुकीचा निकाल समोर येत असतानाच अनेक पक्षांमधील युवा नेते' आपल्या अपयशाचे खापर थेट निवडणूक प्रक्रियेवर फोडत आहेत. हे नेते आपल्या पक्षातीलच त्या उमेदवारांचा अपमान करत आहेत, ज्यांनी वर्षानुवर्षे मेहनत करून जनतेचा विश्वास संपादन केला आणि निवडणुकीत विजय मिळवला.

ते पुढे म्हणतात, केवळ आपल्या मनासारखा निकाल लागत नाही म्हणून लोकशाहीच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. यामुळे केवळ निवडून आलेल्या उमेदवारांचा नव्हे, तर मतदान करणाऱ्या जनतेचाही अपमान होतो. सध्या राज्यातील महापालिकांच्या निकालांमध्ये भाजपा आणि महायुतीला यश मिळताना दिसत असून विरोधकांमधील काही युवा नेत्यांकडून निवडणूक प्रक्रियेवर शंका उपस्थित केल्या जात आहेत. याच पार्श्वभूमीवर आमदार सत्यजीत तांबेंनी केलेले हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.

राजकीय मतभेद असले तरी लोकशाहीच्या मूलभूत प्रक्रियेवर विश्वास ठेवणे आवश्यक असून, निकाल स्वीकारण्याची परिपक्वता प्रत्येक नेत्याने दाखवावी असा स्पष्ट संदेश आमदार तांबे यांच्या या ट्विटमधून दिला आहे.

### बार असोसिएशनमध्ये वकिलांशी साधला संवाद
# अनिच्छेने वकिली व्यवसायात-ॲड. निकम

**समाचार/नगर-दि.१७**

अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेटस् बार असोसिएशनला मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रपती नियुक्त खासदार तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध फौजदारी व विशेष सरकारी ॲड. उज्ज्वलजी निकम यांनी सदिच्छा भेट दिली.



या प्रसंगी बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे पाटील व माजी अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी यांच्या हस्ते ॲड. निकम यांचा सत्कार करण्यात आला. वकिली क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय, निर्भीड व न्यायप्रवण कामगिरीचा यावेळी गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ॲड. निकम म्हणाले की, मुळात मला डॉक्टर व्हायचे होते. मात्र तत्कालीन व्यवस्थेमध्ये वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यामुळे अनिच्छेने वकिली व्यवसाय स्वीकारावा लागला. परंतु आज मागे वळून पाहताना वकिली व्यवसायात येणे हीच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी संधी ठरली आहे.

ते पुढे म्हणाले की, आजच्या काळात नव्या वकिलांसाठी न्यायालयीन कामकाजामध्ये विविध प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. वकिली व्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन नसून तो एक नोबल प्रोफेशन' असून समाजाला न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या माध्यमातून घडते.

यावेळी त्यांनी बार असोसिएशनच्या सर्व सभासदांना व तरुण वकिलांना शुभेच्छा देत न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास बार असोसिएशनचे पदाधिकारी, ज्येष्ठ वकील तसेच मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते. ॲड. आर. बी. खंडेलवाल यांनी आभार मानले.

# ठसा उमटवायची भारताला संधी

**चिनी स्पर्धेमुळे इंटेल चिप्सना निर्माण झालेले आव्हान भारतीय सेमीकंडक्टर उद्योगासाठी मोठी संधी ठरू शकते. गेल्या काही वर्षांपासून भारताने सेमीकंडक्टर उत्पादनावर लक्ष केंद्रित केले आहे. चीनवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी आज अनेक जागतिक कंपन्या पर्यायी पुरवठादार शोधत आहेत. इंटेलसारख्या कंपन्यांनाही चीनबाहेर उत्पादन केंद्र स्थापित करण्याची गरज जाणवत आहे. ही भारतासाठी मोठी संधी आहे.**

**तंत्रवेध**

**उर्मिला राजोपाध्ये**

ऐंशीच्या दशकात वैयक्तिक संगणक लोकप्रिय होत होते आणि प्रत्येक उपकरणावर एक लेबल असायचे, 'इंटेल इन्साईड'. संगणक कुठल्याही उत्पादकाचा असू दे, दोन गोष्टी समान असायच्या. एक म्हणजे 'मायक्रोसॉफ्ट विंडोज' आणि दुसरी म्हणजे इंटेलची चिप. १९८१ मध्ये आयबीएमने इंटेलचा ८०८८ प्रोसेसर वापरून स्वतःचा पीसी संगणक सादर केला. इंटेलने पुढे २८६, ३८६, ४८६ हे प्रोसेसर लाँच केले, ज्याचा संगणक उद्योगावर मोठा प्रभाव पडला. १९९३ मध्ये इंटेलने नवीन पी५ आर्किटेक्चरवर आधारित पेंटियम प्रोसेसर सादर केला. त्याने संगणकाची कार्यक्षमता आणि बाजारातील स्थिती चांगलीच बदलली. मायक्रोसॉफ्ट विंडोज आणि इंटेल प्रोसेसर यांची भागीदारी संगणक क्षेत्रातील वर्चस्वासाठी अत्यंत निर्णायक ठरली. १९९३ मध्ये पेंटियम प्रोसेसर बाजारात आला. हा प्रोसेसर घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी अत्यंत लोकप्रिय झाला. या काळात 'इंटेल इनसाइड' या मार्केटिंग मोहिमेमुळे इंटेल एक घरगुती ब्रँड बनला.

हा झाला इतिहास. सध्या मात्र इंटेलची परिस्थिती चिंताजनक आहे. मागील काही वर्षांपासून चीनमधील वाढत्या स्पर्धेमुळे इंटेल मोठ्या आव्हानांचा सामना करत आहे. एके काळी डेस्कटॉप आणि लॅपटॉप प्रोसेसर मार्केटमध्ये निर्विवाद वर्चस्व असलेल्या इंटेलला आता चीनच्या कंपन्यांकडून जोरदार स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे इंटेलच्या व्यवसायावर नकारात्मक परिणाम होत असून बाजारपेठेवरील पकड हळूहळू सुटत चालली आहे. चीनने त्यांच्या देशांतर्गत सेमीकंडक्टर उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी धोरणे आखली आहेत. चीनला तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवणे हा 'मेड इन चायना २०२५'सारख्या योजनांचा उद्देश आहे. या धोरणांमुळे चिनी कंपन्यांना मोठ्या प्रमाणात सरकारी निधी, सबसिडी आणि करसवलती मिळत आहेत. यामुळे त्या वेगाने प्रगती करत आहेत. या सरकारी मदतीमुळे अनेक चिनी कंपन्यांनी संशोधन आणि विकासावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. त्यांनी प्रगत तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी जगभरातील तज्ज्ञांना आकर्षित केले आहे. या प्रयत्नांमुळे, चीनने केवळ मायक्रोचिप उत्पादनातच नव्हे, तर कृत्रिम बुद्धिमत्ता, चिप्स, स्मार्टफोन प्रोसेसर तसेच विशिष्ट चिप्सच्या क्षेत्रातही लक्षणीय प्रगती केली आहे. चिनी कंपन्या, विशेषतः स्मार्टफोन आणि कमी किमतीच्या लॅपटॉपसाठी चिप्स बनवणारे उत्पादक मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून कमी किमतीत प्रोसेसर उपलब्ध करून देत आहेत. स्वस्त मनुष्यबळ आणि सरकारी मदत असल्यामुळे, ते इंटेलच्या तुलनेत कमी खर्चात उत्पादन करू शकतात.

जागतिक बाजारपेठेतील या घडामोडीचा थेट परिणाम अंतिम उत्पादनाच्या किमतीवर होतो. विकसनशील बाजारपेठांमध्ये ग्राहक किमतीला जास्त महत्त्व देत असताना कमी किमतीचे पर्याय खूप लोकप्रिय होतात. चिनी कंपन्यांनी याच संधीचा फायदा घेतला. 'इंटेल'चे हाय-एंड प्रोसेसर उच्च कार्यक्षमतेसाठी ओळखले जात असले तरी, सर्वसाधारण वापरासाठी कमी किमतीचे चिनी पर्याय अधिक आकर्षक वाटतात. यामुळे, इंटेलला आपल्या उत्पादनांच्या किमती कमी कराव्या लागल्या. त्यामुळे त्यांच्या नफ्यावर थेट परिणाम झाला. गेल्या काही वर्षांमध्ये संगणकाच्या बाजारपेठेमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. स्मार्टफोनचा वाढता वापर आणि टॅब्लेटच्या लोकप्रियतेमुळे लॅपटॉपची विक्री कमी झाली आहे. या परिस्थितीत इंटेलला नवीन बाजारपेठा शोधाव्या लागल्या. परंतु, इथेही त्यांना चीनकडून जोरदार स्पर्धा मिळत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे एआय चिप्सची मागणी प्रचंड वाढली आहे. या क्षेत्रात चीनच्या बायडू आणि अलीबाबा सारख्या कंपन्यांनी स्वतःच्या चिप्स विकसित केल्या आहेत. या चिप्स एआय ॲप्लिकेशन्ससाठी ऑप्टिमाइज्ड केल्या आहेत. त्यामुळे त्या डेटा सेंटर मार्केटमध्ये इंटेलच्या प्रतिस्पर्धी बनल्या आहेत. इंटेलच्या झिऑन प्रोसेसरवर या स्पर्धेचा नकारात्मक परिणाम होत आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील वाढता भू-राजकीय तणाव इंटेलसाठी आणखी एक आव्हान ठरला आहे. अमेरिकेने चीनच्या कंपन्यांवर काही निर्बंध लादल्याने इंटेलसारख्या कंपन्यांना चीनमधील बाजारपेठेत अडचणी येत आहेत. तसेच पुरवठा साखळी (सप्लाय चेन) विस्कळीत होण्याची भीतीही वाढली आहे

इंटेलला चिनी स्पर्धेमुळे निर्माण झालेले आव्हान भारतीय सेमीकंडक्टर उद्योगासाठी एक मोठी संधी ठरू शकते. गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारने सेमीकंडक्टर उत्पादनावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. इंटेलसारख्या जागतिक कंपनीला मिळणारे आव्हान भारतीय कंपन्यांसाठी एक उत्प्रेरक (कॅटॅलीस्ट ) म्हणून काम करू शकते. भारत सरकारने सेमीकंडक्टर व्यवसायाला चालना देण्यासाठी 'सेमीकंडक्टर इंडिया मिशन'सारखे महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केले आहेत. या कार्यक्रमांतर्गत सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन युनिट्स (फॅब्स) स्थापन करणाऱ्या कंपन्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत, जमीन आणि इतर पायाभूत सुविधा पुरवल्या जात आहेत. मायक्रॉन आणि वेदांत-फॉक्सकॉनसारख्या कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे हे क्षेत्र वेगाने विकसित होत आहे. चीनवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी अनेक जागतिक कंपन्या पर्यायी पुरवठादार शोधत आहेत. इंटेलसारख्या कंपन्यांना चीनबाहेर आपले उत्पादन केंद्र स्थापित करण्याची गरज जाणवत आहे. ही भारतासाठी एक मोठी संधी आहे. चीनमध्ये सरकारी धोरणांनी त्यांच्या उद्योगाला ज्या प्रकारे मदत केली, त्याच प्रकारे भारतीय सरकारची धोरणे भारतीय कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. शिवाय भारताकडे जागतिक दर्जाचे इंजिनिअर्स आणि वैज्ञानिक आहेत.

भारताने अलीकडेच दहा अब्ज रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीसह आपला सेमी-कॉन इंडिया कार्यक्रम घोषित केला. हा कार्यक्रम सेमीकंडक्टर, डिस्प्ले उत्पादन आणि डिझाईन इकोसिस्टीममध्ये गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करेल. काही महिन्यांपूर्वी सरकारने सेमिकॉन इंडियामध्ये घोषणा केली की आपला देश एक मजबूत चिप उत्पादन आणि संबंधित इकोसिस्टीम तयार करेल. गेल्या ३० वर्षांमध्ये आपण सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये बरीच प्रगती केली. त्यातून हजारो उद्योग तसेच लाखो रोजगार निर्माण केले. आता पुढील दशक इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उद्योगाचे असेल. अलिकडेच आपण याचा पुरावा ठरणारी 'विक्रम' ही सेमी कंडक्टर चिप तयार करुन जागतिक पातळीवर शाबासकीही मिळवली. म्हणजेच आपण या व्यवसायात ठसा उमटवण्यासाठी आवश्यक उद्योगांना निमंत्रणही देऊ शकतो आणि आपले उत्पादन वेगाने पुढे रेटून एकूणच सेमी कंडक्टर अर्थात चिपनिर्मितीमध्ये वरचष्मा प्रस्थापित करु शकतो. याचा व्यूहात्मक फायदा आयात कमी करून स्थानिक व्यवसाय व रोजगारनिर्मितीही होईल. या उद्योगाला अनेक प्रकारचे कौशल्यवान अभियंते शेकडोंच्या संख्येने लागतील. अनेक जागतिक चिप डिझाइन कंपन्यांची संशोधन आणि विकास केंद्रे भारतात आहेत. या संधीचा फायदा घेऊन भारत चिप डिझाइन आणि सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करू शकतो. भारतीय कंपन्या सेमीकंडक्टर कंपन्या उभारून फक्त उत्पादनच नाही, तर चिप डिझाइनमध्येही आपली क्षमता वाढवू शकतात. या गुंतवणुकीमुळे भारतातील तरुणांना उच्च दर्जाचे रोजगार उपलब्ध होतील आणि देश तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल.

✦✦✦










# द्वीपसमूहाचा व्यूहात्मक विकास

**केंद्र सरकारने अंदमान निकोबार बेट समूहाचा विकास करण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. या बेटाचे भौगोलिक स्थान लक्षात घेऊन केला जात असलेला विकास संरक्षणात्मक दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. असे महाकाय प्रकल्प राबवताना अनेक प्रश्न निर्माण होणार, मात्र म्हणूनच या द्वीपसमूहाचे पर्यावरण आणि तिथल्या दुर्मिळ होत चाललेल्या जातीसमूहाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे.**

**मिशन २०४७**

**प्रा. मुक्ता पुरंदरे**

गेल्या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारने अंदमान आणि निकोबार बेटांना भारताच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वाचे स्थान बनवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा उद्देश हा आहे, की या बेटाने भारताच्या पूर्व भागात सुरक्षा कवचासारखे काम करावे आणि 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात भारताच्या हितांचे रक्षण करावे. यासाठी सरकारने येथे अनेक मोठी कामे केली आहेत. विमानतळ आणि बंदर सुधारण्यावर भर दिला आहे. सैन्यासाठी राहण्याची जागा बांधण्यात आली आहे. देखरेखीसाठी मजबूत यंत्रणा बसवण्यात आल्या आहेत, ग्रेट निकोबार बेटावर एक मोठा बदल केला जात आहे. त्यात एक नवीन आंतरराष्ट्रीय बंदर, एक नवीन विमानतळ, एक टाउनशिप आणि एक गॅस आणि सौर-आधारित पॉवर हाऊस बांधणे समाविष्ट आहे; परंतु या विकासामुळे काही समस्यादेखील उभ्या रहात आहेत. चीनच्या वाढत्या नौदल शक्तीमुळे बंगालच्या उपसागराचे महत्त्व वाढले आहे; परंतु नागरी समाज आणि वन्यजीव तज्ज्ञ या प्रकल्पांना विरोध करत आहेत. त्यांच्या मते यामुळे येथील स्थानिक लोकांचे, विशेषतः शोम्पेन जमातीचे नुकसान होईल. याचा येथील प्रवाळ खडकांवर आणि सागरी जीवनावर वाईट परिणाम होईल. निकोबारमधील मेगापोड पक्षी आणि लेदरबॅक कासवांसारख्या धोक्यात असलेल्या प्रजाती धोक्यात येतील. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी या प्रकल्पाबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यांनी येणाऱ्या पर्यावरणीय आणि आदिवासी आपत्तीचा इशारा दिला. निकोबारी लोक विकासक्षेत्रात असलेल्या त्यांच्या वडिलोपार्जित गावांमधून कायमचे विस्थापित होतील. या विकास प्रक्रियेत साडेआठ लाख ते ५८ लाख झाडांचा बळी देण्यात आला आहे. असे असले, तरी ग्रेट निकोबार प्रकल्पाचे सामरिक महत्त्व विसरता येणार नाही. पर्यावरण, संरक्षणात्मक महत्त्व, आदिम जातीचे अस्तित्त्व याचे संतुलन साधून विकास केला पाहिजे.

ग्रेट निकोबार प्रकल्प हा बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटांच्या दक्षिणेकडील बेटासाठी प्रस्तावित केलेला एक मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्प आहे. ग्रेट निकोबार बेटावर बंदर, विमानतळ, वीज आणि टाउनशिप सुविधा बांधण्यासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणारी ही एक धोरणात्मक आणि पायाभूत सुविधा योजना आहे. त्यामुळे भारताची सागरी सुरक्षा आणि व्यापार वाढेल. या प्रकल्पाला २०२२ मध्ये पर्यावरणीय आणि वन मंजुरी मिळाली. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ८१ हजार कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. 'नीती आयोगा'च्या नेतृत्वाखाली आणि अंदमान आणि निकोबार बेटे एकात्मिक विकास महामंडळाद्वारे अंमलात येत असलेला हा प्रकल्प ग्रेट निकोबारला धोरणात्मक, आर्थिक आणि पर्यटनदृष्टया महत्त्वाच्या केंद्रात रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. जगातील सर्वात व्यस्त शिपिंग लेनपैकी एक असलेल्या मलाक्का सामुद्रधुनीजवळ असलेल्या ग्रेट निकोबारच्या भौगोलिक स्थानाचाही मोठा फायदा होईल. येथे ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधला जात आहे. नागरी आणि संरक्षणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेल्या या विमानतळाची क्षमता २०५० पर्यंत येथे सुमारे चार हजार प्रवासी क्षमता असेल, असा अंदाज आहे. तीन ते चार लाख लोकसंख्येचे सुनियोजित शहर असेल. त्यात निवासी, व्यावसायिक आणि संस्थात्मक जागा असतील. गॅस आणि सौर-आधारित वीज प्रकल्प, तसेच रस्ते, पाणीपुरवठा आणि सहाय्यक पायाभूत सुविधा तिथे निर्माण केल्या जातील.





ग्रेट निकोबार प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा आणि व्यापारासाठी महत्त्वाचा नाही, तर त्याचे भारतासाठी राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक महत्त्वदेखील आहे. मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ असल्यामुळे त्याचे धोरणात्मक स्थान महत्त्वाचे आहे. ग्रेट निकोबार सहा अंश अक्षांशाजवळ आहे. मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ एक महत्त्वाचा मार्ग आहे. तिथून जागतिक व्यापाराच्या ३०-४० टक्के आणि चीनची बहुतेक ऊर्जा आयात होते. ट्रान्सशिपमेंट पोर्ट आणि विमानतळ विकसित करून भारत जगातील सर्वात व्यस्त आणि सर्वात महत्त्वाच्या 'चोक पॉइंट'पैकी एकाद्वारे सागरी वाहतुकीचे निरीक्षण आणि संरक्षण करू शकतो. यामुळे हिंद महासागरात चीनची उपस्थिती संतुलित करण्याची भारताची क्षमता वाढते. बीजिंगच्या 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणाविरुद्ध या प्रकल्पाचा वापर केला जाणार आहे. त्यात हिंद महासागरात बंदरे आणि सुविधांचे जाळे तयार केले जाणार आहे. हे नियोजित दुहेरी वापराचे आंतरराष्ट्रीय विमानतळ नागरी आणि संरक्षण दोन्ही उद्देशांसाठी काम करेल. त्यामुळे भारताच्या एकमेव त्रि-सेवा कमांड असलेल्या अंदमान आणि निकोबार कमांडमध्ये नौदल आणि हवाई दलाची जलद तैनाती शक्य होईल. यामुळे अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील प्रमुख सागरी क्षेत्रांवर भारताची देखरेख मजबूत होईल. चीनने म्यानमार, श्रीलंका आणि पाकिस्तानमधील ग्वादर, हंबनटोटा आणि क्युकप्युसारख्या बंदरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. ग्रेट निकोबारमधील जागतिक दर्जाचे भारतीय बंदर प्रादेशिक आणि जागतिक शिपिंगसाठी चिनी बंदरांना पर्याय तयार होईल. 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात लॉजिस्टिक्स हब म्हणून भारताची भूमिका वाढवेल आणि प्रदेशात भू-राजकीय किंवा लष्करी तणावाच्या बाबतीत भारताला फायदा देईल.

या भागात बंदर आणि सहाय्यक पायाभूत सुविधांमुळे शिपिंग मार्गांचे निरीक्षण, ट्रॅक आणि नियंत्रण करण्याची भारताची क्षमता सुधारेल. यामुळे 'क्वाड' सुरक्षा उपक्रमांमध्ये (अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासह) भारताची भूमिका बळकट होईल आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशात मुक्त आणि खुले नेव्हिगेशन सुनिश्चित होईल. हा संपूर्ण प्रकल्प पुढील ३० वर्षांमध्ये उभा राहील. या प्रकल्पात आतापर्यंत टप्प्याटप्प्याने कामे चालू आहेत. 'एनटीपीसी'ने या वर्षी एप्रिलमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पासाठी निविदा मागवल्या होत्या तर गेल्या वर्षी सप्टेंबर २०२४ मध्ये गॅलाथिया बेला प्रमुख बंदर म्हणून घोषित करण्यात आले. अहवालानुसार, सुमारे एक डझन कंपन्यांनी ते चालवण्यात रस दाखवला आहे. त्याच वेळी टाउनशिप विकासासाठी झाडे मोजण्याचे आणि तोडण्याचे कामदेखील सुरू आहे. या प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी नोव्हेंबर २०२२ मध्येच मिळाली होती. त्याच वेळी, त्याच्या देखरेखीसाठी ८० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. भारतीय नौदलाचा आयएनएस तळ ग्रेट निकोबारमध्ये आहे. या सर्व बाबी लक्षात घेता हा बेट समूह पूर्व हिंद महासागरातील विद्यमान संरक्षण आणि देखरेखीच्या कारवायांना बळकटी देतो. त्याचे भौगोलिक स्थान भारताला आग्नेय आशियाशी अधिक आर्थिक कनेक्टिव्हिटीदेखील प्रदान करते. या बेट गटातील बहुतेक भाग नदी क्रूझिंग, कायाकिंग आणि विविध प्रजातींचे पक्षी निरीक्षण यासारख्या पर्यावरणीय पर्यटन क्रियाकलापांसाठी योग्य आहेत. सध्या, मर्यादित पायाभूत सुविधा आणि प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे ग्रेट निकोबारचा भारतीय मुख्य भूमी आणि आंतरराष्ट्रीय शहरांशी मर्यादित संपर्क आहे. त्यामुळे, सरकारच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे येथील पर्यटनाला चालना मिळेल आणि आसपासच्या देशांपर्यंत चांगल्या प्रकारे पोहोचता येईल.

स्थानिक अर्थव्यवस्थेलाही या प्रकल्पाचा फायदा होईल. ट्रान्सशिपमेंटसाठी भारताचे परदेशी बंदरांवर अवलंबून राहणे अनेक समस्या निर्माण करते. भारतीय बंदरे भारतात किंवा भारतातून येणाऱ्या मालवाहतुकीत दरवर्षी लाखो डॉलर्सचे नुकसान सहन करत असताना, परदेशी बंदरांवर बंदर हाताळणी शुल्क आणि ट्रान्सशिपमेंट खर्च भारतीय व्यवसायांच्या खर्चात भर घालतात. याशिवाय, भारताचे परदेशी बंदरांवरील अवलंबित्व राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करते. या दृष्टिकोनातून ग्रेट निकोबारमधील गॅलाथिया बे पोर्ट प्रकल्पाचे उद्दिष्ट भारतीय व्यापार आणि व्यवसायासमोरील असुरक्षिततेचा सामना करणे हे आहे. मेगा ट्रान्सशिपमेंट पोर्ट दर वर्षी १४ दशलक्ष टीईयू (वीस फूट समतुल्य युनिट्स)पेक्षा जास्त हाताळेल अशी अपेक्षा आहे. ही ट्रान्सशिपमेंट क्षमता ते कोलंबो, सिंगापूर आणि क्लांग बंदरांना पर्यायी बनवते. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय (एमओपीएसडब्ल्यू) या ट्रान्सशिपमेंट पोर्ट प्रकल्पाची देखरेख करते. ते २०२८ पर्यंत पूर्ण होणार आहे. तसेच भारतीय विमानतळ प्राधिकरणाला ग्रेट निकोबारमध्ये ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी अधिकृत करण्यात आले आहे. त्याचे उद्दिष्ट वाइड-बॉडी विमाने हाताळणे तसेच कनेक्टिव्हिटी आणि पर्यटकांची हालचाल वाढवणे हे आहे. ग्रेट निकोबारचे धोरणात्मक स्थान कोबाल्ट, निकेल, तांबे आणि मँगनीज समृद्ध असलेल्या पॉलिमेटॅलिक नोड्यूलच्या किनारी खाणकामासाठी मोठी क्षमता देते. खनिजांच्या क्षेत्रात स्वयंपूर्णता प्राप्त करणे भारतासाठी महत्त्वाचे आहे. अर्थात हा प्रकल्प राबवताना अनेक तज्ज्ञांनी आणि राजकीय पक्षांनी पर्यावरणविषयक तसेच सामाजिक प्रश्नांना नेमकी उत्तरे दिली गेली पाहिजेत.

✦✦✦

# सामान्य माणूस खरोखर दखलपात्र आहे?

**सामान्य माणसासाठी मतदान करणे हा हक्क आणि राष्ट्रीय कर्तव्यही असते. बोटाला शाई लावलेले फोटो समाजमाध्यमांवर पोस्ट करून आपण किती कर्तव्यदक्ष आहोत, हे तो जगाला सांगत असतो, पण बहुतेक राजकीय उमेदवार सामान्य माणसाकडे मतांचा आकडा म्हणून पाहतात. त्यांच्या दृष्टीने तो नागरिक नसून व्होट बँकेचा केवळ एक घटक असतो. बदलत्या सामाजिक परिस्थितीत सामान्य माणूस दखलपात्र कसा बनणार?**

दृष्टिकोन
**महेश धर्माधिकारी**

सध्या सगळीकडे निवडणुकांचे वारे वाहत आहेत. राज्यात नगरपालिका, नगर परिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुका पार पडल्या. यापुढे जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहेत. प्रत्येक उमेदवार निवडणूक जकण्यासाठी सर्वस्व पणाला लावतो. साम, दाम, दंड, भेद आदी क्लृप्त्या वापरून आपण प्रतिस्पर्धी उमेदवारावर कशी कुरघोडी करू शकू याचाच विचार करत असतो. मात्र, या एकूण प्रक्रियेत ज्याच्या भल्यासाठी निवडणुका घेतल्या जातात त्या सामान्य माणसाचा कितपत विचार केला जातो, हा एक संशोधनाचा विषय आहे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद सामान्य माणूस असल्याचे मानले जाते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीम ध्ये मतदानाचा अधिकार, अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि सत्ताधाऱ्यांना निवडण्याची ताकद सामान्य नागरिकाकडे आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर सात दशकांनंतरही एक प्रश्न कायम आहे आणि तो म्हणजे हा साम ान्य माणूस खरोखरच राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे का, की तो केवळ निवडणुकांपुरताच महत्त्वाचा घटक ठरतो? आज सामान्य माणूस रोजच्या जीवनात अनेक समस्यांशी झुंजत आहे. वाढती म हागाई, बेरोजगारी, अपुऱ्या नागरी सुविधा, भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि प्रशासनातील अनास्था यामुळे त्याचे जीवन अधिकाधिक कठीण होत चालले आहे. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा, शिक्षण आणि रस्ते अजूनही अपुरे आहेत; तर शहरी भागात वाहतूक कोंडी, प्रदूषण, महाग घरभाडे आणि विशेषत: महिलांची असुरक्षितता याने नागरिक त्रस्त आहेत. याशिवाय तरुणांच्या बेराजगारीचा प्रश्न तर वाढतच चालला आहे. मात्र निवडणुककाळात चित्र बदलते.

निवडणुका जाहीर होताच सामान्य माणूस अचानक राजकारणाचा केंद्रबदू बनतो. नेते त्याच्या दारात येतात, समस्या




ऐकण्याचे नाट्य घडते, आश्वासनांची रेलचेल होते. प्रत्येक मतासाठी याच सामान्य माणसाला दोन ते अडीच हजार रुपयांची खैरातही वाटली जाते. पण निवडणुका संपताच हा सामान्य माणूस पुन्हा दुर्लक्षित होतो. एकदा उमेदवाराला निवडून दिले की आपल्या समस्या ऐकून घ्यायलाही त्याला वेळ नसतो. निवडणुकीत पाण्यासारख्या खर्च केलेल्या पैशाची वसुली त्याला अधिक महत्त्वाची वाटत असते. सामान्य माणसाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी पुढील निवडणूक येईपर्यंत वाट पाहावी लागते. सामान्य माणसाच्या दृष्टीने निवडणुकीत मतदान करणे हा त्याचा हक्क आणि राष्ट्रीय कर्तव्यही असते. बोटाला शाई लावलेले फोटो समाजमाध्यमांवर पोस्ट करून तो आपण किती कर्तव्यदक्ष आहोत, हे जगाला ओरडून सांगत असतो, पण बहुतेक राजकीय उमेदवार सामान्य माणसाकडे मतांचा आकडा म्हणून पाहतात. त्यांच्या दृष्टीने तो नागरिक नसून व्होट बँकेचा केवळ एक घटक असतो. त्याच्या रोजच्या समस्या, जीवनातील संघर्ष यांचा सखोल अभ्यास करण्याऐवजी त्याला भावनिक मुद्द्यांत अडकवले जाते. धर्म, जात, राष्ट्रवाद, अस्मिता, भीती कवा अभिमान या भावनांचा कुशल वापर करून मतांचे ध्रुवीकरण केले जाते. जाती-जातींमध्ये, विविध धर्मांमध्ये भांडण लावणे हा तर राजकीय पक्षांचा आवडता खेळ. या भांडणांच्या इंधनावर स्वत:ची पोळी भाजून घेण्यात ते तरबेज आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये जातीय अस्मिता एवढ्या टोकदार झाल्या आहेत की प्रत्येक जातीने आपले महापुरूष जणू वाटून घेतले आहेत. एरवी रोज एकत्र काम करणारे, रोज एकत्र डबा खाणारेही या खोट्या जातीय अस्मितेपायी एकमेकांची तोंडे पाहणे पसंत करत नाहीत तेव्हा सद्सदविवेकाचा पराजय, तर राजकीय स्वार्थाचा विजय झाल्याची खंत वाटते. जात हाच आजच्या राजकारणाचा केंद्रबदू बनला आहे. उमेदवारांची निवड, मतदानाचे गणित आणि आघाड्या जातीनुसार ठरतात. विकास, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यापेक्षा जात महत्त्वाची ठरते. मतदारांनी हा दृष्टिकोन बदलला नाही तर हे थांबणार नाही, हे वास्तव आहे. राजकीय पक्षांच्या दृष्टीने आणखी एक मोठी व्होट बँक म्हणजे शेतकरी. दर वेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जमाफी आदी विषयांवर केवळ राजकारण होते. या समस्यांच्या मुळाशी जाऊन सोडवण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. प्रत्येक निवडणुकीमध्ये शेतकरी, कामगार, महिला, तरुण, मध्यमवर्ग यांच्यासाठी वेगवेगळे जाहीरनामे तयार होतात; मात्र त्यातील बहुतेक घोषणा कागदावरच राहतात. धोरणे आखली जातात, पण अंम लबजावणी अपुरी आणि संथ असते. सामान्य माणसाची फसवणूक तर बहुआयामी असते. अवास्तव आश्वासने देऊन मोठी स्वप्ने दाखवली जातात. कोट्यवधी नोकऱ्या, सर्वांसाठी घरे, मोफत सुविधांची आश्वासने दिली जातात. भावनिक मुद्द्यांचा वापर करून मूळ प्रश्न बाजूला सारले जातात. आकडेवारीचा गैरवापर होतो. शेतकरी कर्जमाफीसारख्या घोषणांचा गाजावाजा होतो. प्रत्यक्षात अटी आणि मर्यादांमुळे अनेक शेतकरी सवलतीवाचून वंचित राहतात.

राजकीय आश्वासने पाळली न जाण्याची कारणे संरचनात्मक आहेत. भारतात निवडणूक जाहीरनाम्याला कोणताही कायदेशीर दर्जा नाही. त्यामुळे सत्तेत आल्यानंतर आश्वासने विसरली कवा पाळली नाहीत तरी शिक्षा होत नाही. सत्तेत आल्यानंतर राजकारण्यांचे प्राधान्यक्रम बदलतात, निधीअभावी योजना रखडतात, प्रशासन अपयशी ठरते कवा हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. परिणामी, मतदार फसवला जातो, पण त्याच्याकडे तक्रार करण्यासाठी प्रभावी यंत्रणा नसते. महानगरांपासून लहान शहरांपर्यंत नागरी सुविधा ही कायमची डोकेदुखी ठरली आहे. खड्डेमय रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, कचऱ्याचे ढीग, ड्रेनेज समस्या आणि वाढती गुन्हेगारी हे नित्याचे दृश्य झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकारण इतके शिरले आहे की विकास दुय्यम ठरतो. पोलिसांवर राजकीय दबाव, तपासातील ढिलाई आणि न्यायालयीन विलंब यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर नागरिकांचा विश्वास डळमळीत होत आहे. आजच्या घडीला राजकीय आश्वासनांचा मागोवा घेणारी स्वतंत्र, प्रभावी आणि बंधनकारक यंत्रणा अस्तित्वात नाही. निवडणूक आयोगाची भूमि का आचारसंहितेपुरती मर्यादित आहे. न्यायालये कधी कधी हस्तक्षेप करतात, पण ती अपवादात्मक बाब असते. परिणामी, आश्वासन न पाळणाऱ्या राजकारण्यांना जबाबदार धरण्याची शक्यता जवळजवळ नाहीशी होते. विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षांविरोधात आवाज उठवतात, न केलेल्या कामांची जंत्री सादर करतात, भ्रष्टाचारावरून सत्ताधारी पक्षाचे वाभाडे काडतात, पण त्यात राजकारणाचाच भाग अधिक असतो.

बरेचदा हे मुद्दे केवळ स्वत:ची पोळी भाजून घेण्यासाठीच वापरले जातात. त्यातून स्वत:चा आथिक कवा संवैधानिक फायदा करून घेतला की हे मुद्दे आपोआप मागे पडतात. कोणीच सामान्य माणसाचा विचार करताना दिसत नाही. देशातील बेरोजगारीचा प्रश्न गंभीर असताना, बेरोजगार तरुणांचा राजकीय वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. मोर्चे, आंदोलन, प्रचार, सोशल मीडिया ट्रोलग यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. तात्पुरते पैसे, पदांचे आमिष कवा भावनिक मुद्दे देऊन त्यांना गुंतवले जाते. मोर्चे आणि आंदोलनांमध्ये या तरुणांवर खटले दाखल होतात आणि त्याचा त्यांच्या पुढील कारकिर्दीवर वाईट परिणाम होतो. याच तरुणांचा उपयोग विधायक कामांसाठीही करून घेता येऊ शकतो. त्यांच्यासाठी आर्थिक स्थैर्याच्या संधी निर्माण करून देता येऊ शकतात, पण दीर्घकालीन रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि उद्योगवाढ याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. कारण प्रश्न विचारणारा, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी तरुण सत्तेसाठी अस्वस्थ ठरतो. म्हणजेच असा तरूण वर्ग त्यांना नकोच असतो. भारतीय राजकारणातील आणखी एक दुर्दैवी सत्य म्हणजे गुन्हेगारांचा राजकारणातील सर्रास वावर आणि त्याला मिळत असलेली समाजमान्यता. ही समस्या फारच गंभीर बनली आहे. संसद आणि विधानसभांमध्ये गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेले लोक मोठ्या संख्येने दिसतात. निवडणुका जकण्यासाठी पैसा, बाहुबल आणि गुन्हेगारी नेटवर्कचा वापर केला जातो. कबहुना, निवडून येण्यासाठी हेच निकष महत्त्वाचे मानले जातात. यामुळे स्वच्छ प्रतिमेचे, प्रामाणिक उमेदवार बाजूला पडतात आणि लोकशाहीची मूल्ये धोक्यात येतात.

राजकारणाचे क्षेत्र स्वच्छ असावे असे वाटणाऱ्यांसाठी 'नोटा' हा एक पर्याय आहे, मात्र त्याचा प्रत्यक्ष परिणाम शून्य आहे. 'नोटा' ला सर्वाधिक मते मिळाली तरी निवडणूक रद्द होत नाही कवा नवीन उमेदवार उभे राहत नाहीत. त्यामुळे तो केवळ निषेध नोंदवण्यापुरताच




मर्यादित राहतो. आणखी एक चुकीची आणि सर्वांच्या अंगवळणी पडलेली 'परंपरा' म्हणजे अनैसर्गिक युत्या आणि आघाड्या. विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्तेसाठी वैचारिक विरोधकही एकत्र येताना दिसतात. अशा अनैसर्गिक आघाड्या मतदारांचा विश्वास ढासळवतात. सत्तेसाठी सर्व काही चालते ही भावना बळावते आणि राजकारणाविषयी उदासीनता वाढते. अनेक पक्षांमध्ये पक्षांतर करणाऱ्यांना तिकीट आणि पदे मिळतात, तर वर्षानुवर्षे काम करणारे कार्यकर्ते दुर्लक्षित राहतात. यामुळे पक्षांमध्ये नाराजी, फ ूट आणि संधीसाधूपणा वाढतो. राजकीय निष्ठेपेक्षा सत्तेसाठीची गणिते महत्त्वाची ठरतात. भारतीय राजकारणात सामान्य माणूस आजही निर्णयप्रक्रियेच्या केंद्रस्थानी नाही, तर एक साधन आहे. खऱ्या अर्थाने बदल घडवायचा असेल तर जागरूक मतदार, प्रश्न विचारणारा तरुण, पारदर्शक प्रशासन आणि राजकीय आश्वासनांना कायदेशीर बंधन आवश्यक आहे. अन्यथा, लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित राहील आणि सामान्य माणूस सतत फसवला जात राहील. म्हणूनच आपण बदलाची वाट पाहणार आहोत की बदल घडवणार आहोत, खरा प्रश्न हाच आहे.

✦✦✦

# अधिकाऱ्यांमधले उंदीर शोधण्याचे आव्हान

**देशभरात सातत्याने धान्य खरेदी, साठवणुकीतील घोटाळ्याच्या बातम्या येत असतात. अधिकाऱ्यांनी घोटाळा करायचा आणि प्राण्यांवर दोषारोप करायचा, असे सतत घडत आहे. छत्तीसगडमध्ये २६ हजार क्विंटल धान उंदरांनी फस्त केल्याचा कांगावा अलिकडेच अधिकाऱ्यांनी केला; परंतु खरेदी आवक-जावकच्या बनावट पावत्या तसेच अन्य बनावट कागदपत्रांमुळे पितळ उघडे पडले. हा खोटेपणा कधी थांबणार?**

राज्यरंग
**राही भिडे**, ज्येष्ठ पत्रकार

छत्तीसगडमधील कवर्धा जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तिथे सुमारे सात कोटी रुपये किमतीचे २६ हजार क्विंटल धान गायब करण्यात आले. त्याला पायच फुटले म्हणा ना! या घटनेने जनता हैराण झाली असली, तरी जिल्ह्याच्या पणन विभागातील अधिकारी या नुकसानीसाठी उंदीर, वाळवी आणि कीटकांना जबाबदार धरत आहेत. २०२४-२५ मध्ये धान खरेदी करण्यात आले होते. हे संपूर्ण प्रकरण २०२४-२५ चे आहे. तेव्हा सरकारने शेतकऱ्यांकडून आधारभूत किमतीवर धान खरेदी केले होते. जिल्ह्यातील दोन प्रमुख साठवणूक केंद्रांवर हे धान साठवण्यात आले होते. दोन्ही केंद्रांवर एकूण सात लाख ९९ हजार क्विंटल धान साठवण्यात आले होते. धान उचलल्यानंतर साठा जुळवला असता, या दोन्ही साठवणूक केंद्रांवर २६ हजार क्विंटल धानाचा तुटवडा आढळून आला. सर्वात मोठी तफावत बाजार चारभाठा साठवणूक केंद्रात आढळून आली. तिथे २२ हजार क्विंटल धान गहाळ असल्याचे आढळून आले. याची किंमत अंदाजे ७ कोटी रुपये होती. या प्रकरणाबाबत बाजार चारभाठा संकलन केंद्राच्या प्रभारीविरुद्ध उच्चस्तरीय तक्रार दाखल करण्यात आली. खरेदी केंद्र अधिकाऱ्यांशी संगनमत करून प्रभारींनी धानाची खोटी आवक-जावक दाखवली. प्राथमिक चौकशीत तक्रारी खऱ्या असल्याचे आढळून आले आणि त्यांना काढून टाकण्यात आले. विभागीय आदेशांनुसार धानाची दोन टक्के कमतरता आढळली, तर संबंधित व्यक्तीला निलंबित करणे, चौकशी करणे आणि नंतर एफआयआर दाखल करणे आवश्यक आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो, की जर उंदीर आणि वाळवी यांनी धान खाल्ले असेल, तर बनावट बिले कोणी तयार केली? बनावट नोंदी कोणी केल्या? सीसीटीव्हीमध्ये छेडछाड कोणी केली? आणि जर सर्व काही ठीक असेल तर कर्मचाऱ्याला का काढून टाकण्यात आले?

वस्तुत: येथे कामगारांची बनावट उपस्थिती नोंदवण्यात आली. संकलन केंद्रात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये वारंवार छेडछाड करण्यात आली. या पद्धतशीर फसवणुकीमुळे सुमारे सात कोटी रुपयांचा आर्थिक



घोटाळा झाला. अधिकाऱ्यांच्या विधानात मोठी तफावत आहे. जिल्हा मार्केटिंग अधिकारी (डीएमओ) अभिषेक मिश्रा यांनी सांगितले, की संकलन केंद्राचे प्रभारी प्रीतेश पांडे यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आले. हवामान परिस्थिती आणि उंदीर, वाळवी आणि कीटकांमुळे झालेल्या नुकसानामुळे धान कमी भरल्याचे त्यांनी सांगितले. कवर्धा जिल्ह्यातील परिस्थिती राज्यातील इतर ६५ संकलन केंद्रांपेक्षा चांगली असल्याचा दावाही त्यांनी केला. या केंद्राची ही अवस्था असेल, तर इतर केंद्रांची काय अवस्था असेल, याचा विचार न केलेलाच बरा! दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या सहाय्यक जिल्हा अन्न अधिकाऱ्यांनी सांगितले, की तक्रार गंभीर आहे आणि प्राथमिक तपासात आरोप खरे असल्याचे आढळून आले आहे. बाजार चारभाठा संकलन केंद्राच्या प्रभारींविरुद्ध विविध बाबींवर तक्रार प्राप्त झाली आहे. चौकशीसाठी एक पथक स्थापन करण्यात आले आहे आणि अंतिम अहवाल आल्यानंतर कठोर कारवाई केली जाईल. या प्रकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. कोट्यवधी रुपयांचे धान गायब होणे आणि उंदीर आणि वाळवी यांच्यावर दोषारोप केल्याने प्रशासकीय यंत्रणा आणि देखरेख यंत्रणेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. चौकशीनंतर या प्रकरणात कोणाला शिक्षा होणार आणि शेतकऱ्यांचे हित कसे भरून काढले जाईल हे पाहणे बाकी आहे.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे एक उंदीर दररोज १५ ते वीस ग्रॅम धान खातो. अन्य काहीही खायला मिळाले नाही, तरी तो जगतो. धान वर्षभर तिथे होते. २६ हजार क्विंटल धान्य फस्त करण्यासाठी त्या गोदामात दररोज साडेतीन लाख उंदीर यायला हवेत. तेवढी त्या गोदामाची क्षमता आहे का, हा खरा प्रश्न आहे. गैरप्रकार माणसाने करायचे आणि त्याचे खापर प्राण्यांवर फोडायचे ही विकृती आजची नाही. तसे करताना संबंधित अधिकाऱ्यांनी तर्कसंगत मांडणी करायची तर ते ही नाही. हास्यास्पद दावे करून आपल्या गळ्यातील जोखड दुसऱ्याच्या गळ्यात फेकून मोकळे व्हायचे, ही वृत्ती असते; परंतु कधी तरी पितळ उघडे पडतेच. २०२२ मध्ये वैशाली जिल्ह्यातील गंडक कालव्यावरील एका धरणाचे नुकसान झाले होते. त्या वेळी असे म्हटले जात होते, की उंदीर धरण कुरतडत होते. त्यामुळे ते गळती लागून फुटले आणि गावात पाणी शिरले. जून २०२४ मध्ये सिवानमधील नवादा गावातही अशीच एक घटना घडली. उंदरांवर दोषारोप ठेवण्यात आला. जास्त पाण्याच्या भारामुळे धरण कमकुवत होऊन फुटले आणि नवादा गावात पाणी शिरले. धरण फुटल्याची जबाबदारी असलेले कनिष्ठ अभियंता मदन मोहन यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, की कालव्याच्या बाहेर जाण्यासाठी जागा सोडण्यात आली. उंदरांनी त्यात सर्वत्र छिद्रे पाडली होती. पाणी भरल्यामुळे गळती वाढली आणि अशा प्रकारे धरण फुटले. महाराष्ट्रातही तत्कालीन जलसंपदा मंत्री तानाजी सावंत यांनी चिवरे धरण खेकड्यांनी उकरल्यामुळे फ ुटल्याचा अजब दावा केला होता. काही दिवसांपूर्वी मुंबई-दिल्ली द्रुतगती मार्गाला भगदाड पडण्याचे खापरही उंदरावर फोडण्यात आले होते.

अधिकारी उंदरांवर कशाचा दोषारोप करतील याचा भरवसा नसतो. २०१६-१७ मध्ये कैमूर आणि पाटणा येथे दारूबंदीच्या काळात जप्त केलेल्या दारूचा साठा नंतर कमी आढळला. तेव्हा उंदरांवर दारू पिण्याचा आरोप करण्यात आला. विशेष म्हणजे असा आरोप पोलिसांनीच पत्रकार परिषदेत केला. मार्च २०१९ मध्ये पाटण्यातील बोरिंग रोडवरील एका दागिन्यांच्या दुकानातून उंदरांनी हिऱ्यांचे दागिने चोरले. अशा घटना रोखण्यासाठी सरकारने प्रथम यंत्रणेत घुसलेल्या 'उंदरां'चा बंदोबस्त केला पाहिजे. एका रुग्णालयात सलाईनचा साठा कमी आढळला, तर तिथेही उंदरांनी सलाईन प्यायल्याचा दावा केला. मध्य प्रदेशमधील जबलपूर येथे झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या धान्य घोटाळ्यात झालेले सरकारी तिजोरीचे नुकसान भरून काढण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला. जबलपूर जिल्हाधिकाऱ्यांनी १२ कर्मचाऱ्यांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश जारी केले. जबलपूरमध्ये झालेल्या धान खरेदी घोटाळ्यात या व्यक्तींचा सहभाग असल्याचा आरोप आहे. त्यामुळे सरकारचे अंदाजे ४३ कोटी रुपयांचे नुकसान झाले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून १६ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. धान्य वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांम ध्ये स्कूटर, कारचे क्रमांक देण्यात आले. या घोटाळ्यात सरकारची फसवणूक



करण्याव्यतिरिक्त अनेक शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली आणि त्यांना त्यांचे पैसे देण्यास नकार देण्यात आला. 'एसआयटी'च्या तपासात याचे पुरावे सापडले आहेत. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई होऊ शकते. तत्कालीन एसडीएम, एडीएम आणि लेखापाल यांनाही कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

आता हरयाणातही असाच पाच हजार कोटी रुपयांचा धान्य घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता आहे. तिथल्या शेतकरी संघटनांनी त्याविरोधात आंदोलन सुरू केले आहे. म्हणजेच एकुणात, उंदरांवर किंवा अन्य प्राण्यांवर दोषारोपण करुन मनुष्यप्राणी काळे धंदे करत आहे. अशा गैरव्यवहारांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे, शिवाय ते ठराविक प्रांत किंवा राज्यापुरते मर्यादीत नाही. म्हणजेच गैरव्यवहाराची ही क्लृप्ती सर्वदूर पसरली आहे. आणि त्याच्या मुळाशी आहे ती पैशांची हाव आणि या प्रकारे अनियमितता झाली तरी ती तपास अधिकाऱ्यांच्या लक्षात येणार नाही, हा विश्वास. याखेरीज, गैरप्रकार उघडकीस आला तरी आपल्याला वाचवणारे कोणी तरी आहे, याचीही खात्री चोर अधिकाऱ्यांना आहे. असा प्रकार सार्वत्रिक होत असल्यामुळे सरकारने थोडे जागे होऊन परिस्थितीवर नियंत्रण ठेवायला हवे.

✦✦✦

# विशेष श्रमसंस्कार शिबिरातून घडतो व्यक्तिमत्व विकास - डॉ.तांबे



**समाचार/नगर-दि.१७**

साकूर येथील रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन कामटवाडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सदस्य डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्टचे सदस्य दिपक फिरोदिया होते. डॉ.तांबे म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात शिबिराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होते. शिबिराच्या काळात होणाऱ्या विविध उपक्रमांतून ग्रामविकासाला हातभार लागेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील समस्या जाणून घेता येतात आणि विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व कळते. त्याचबरोबर'विशेष श्रमसंस्कार शिबिरातून व्यक्तिमत्त्व विकास होतो. दिपक फिरोदिया यांनी सांगितले की, श्रम संस्कार शिबिर केवळ सात दिवसांचा मुक्काम नसून, तो तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. पुस्तकी ज्ञानापेक्षा समाजाच्या प्रत्यक्ष मातीत मिसळून जे शिक्षण मिळते, ते जास्त समृद्ध असते.

प्राचार्या डॉ. हेमलता राठोड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. म्हतू खेमनर यांनी शिबिराची प्रास्ताविकातून भूमिका मांडली.

या प्रसंगी मुख्याध्यापक मारूती घुले, ग्रामस्थ आणि महाविद्यालयाचे प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. आरजू शेख यांनी केले, तर आभार प्रा. रंजित गिरी यांनी मानले.



राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा युतीचे वार्ड क्रमांक १७ चे नवनिर्वाचित नगरसेवक मयूर कन्हैयालाल बांगरे त्यांचा सत्कार करताना रेल्वे स्टेशन श्री दत्त हॉटेल व सूर्य ग्रुप ऑफ हॉटेल्सचे संचालक दत्तात्रय गायकवाड, रमेश गायकवाड, अजित गायकवाड, अभिजीत गायकवाड, अभिमन्यू गायकवाड, अजय शेळके, वैभव दळवी, अमोल रणदिवे, मास्तर पेटारे, गौरव सस्कर, रुपेश सोहत्रे व परिसरातील मित्रपरिवार

## नगरमध्ये २३ रोजी विद्यारंभ संस्कार सोहळा

**समाचार/नगर-दि.१७**

प्रोफेसर चौक येथील परिवर्तन प्रतिष्ठान संचलित पालवी शिशुविहार येथे येत्या २३ जानेवारी रोजी वसंत पंचमी अर्थात सरस्वतीमाता प्रकट दिनाचे औचित्य साधून विद्यारंभ संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या संस्कार सोहळ्यासाठी चार वर्ष पूर्ण झालेल्या बालकांना नावनोंदणी करता येणार असल्याचे पालवी शिशुविहारच्या संचालिका मुग्धा घोटणकर यांनी सांगितले. बासर येथील एकमेव सरस्वती मंदिरात केला जाणारा हा संस्कार अहिल्यानगर शहरात करता येणार आहे. भारतीय संस्कृतीतील सोळा संस्कारांपैकी एक असलेला हा संस्कार औपचारिक विद्या ग्रहण करण्याची सुरवात करण्यासाठी केला जातो. सरस्वतीच्या आशीर्वादाने आणि आईच्या मांडीवर बसून केला जाणाऱ्या या संस्काराचे मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्व सांगितले आहे.

सदर सोहळा २३ जानेवारी, शुक्रवार रोजी पालवी शिशुविहारच्या प्रांगणताच संपन्न होणार असून या संस्कार सोहळयासाठी जास्तीत जास्त नावनोंदणी करून लाभ घेण्याचे आवाहन पालवी शिशुविहारच्या प्रधानाचार्या सौ. स्वाती खिस्ती तसेच व्यवस्थापिका सौ. मानसी देशपांडे यांनी केले आहे. सदर उपक्रमाविषयीच्या अधिक माहितीसाठी तसेच नावनोंदणी साठी ९०११५६८५६७ या क्रमांकावर संपर्क करण्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## फातीमा शेख जयंतीनिमित्त शिबीर

**समाचार/नगर-दि.१७**

फातिमा शेख यांचे विचार आत्मसात करून आपण शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सेवेतून समाजासाठी कार्य करत राहू, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.असे प्रतिपादन प्रसिद्ध डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोग तज्ञ डॉ अशफाक पटेल यांनी केले.

अल करम हॉस्पिटल व मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका क्रांतीज्योती फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त अल करम हॉस्पिटल येथे सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

शिबिरात प्रसिद्ध फिजीशियन डायबेटोलॉजिस्ट हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अशफाक पटेल यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. तपासणी झालेल्या सर्व रुग्णांना मोफत औषधेही वितरित करण्यात आली.



यावेळी तौफिक तांबोली, शेरअली शेख, आबीद दुलेखान यांच्यासह सामाजिक व आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. फातिमा शेख यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले असून त्यांच्या विचारांना आरोग्यसेवेतून पुढे नेण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सुत्रसंचालन आबीद खान यांनी केले.तर आभार तौफिक तांबोली यांनी मानले.

## एकदंत कॉलनीत गणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**समाचार/नगर-दि.१७**

दातरंगे मळा येथील एकदंत कॉलनीत श्री गणेश जयंती वार्षिक उत्सवातील विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. यंदा उत्सवाचे २२ वे वर्ष असून, सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे हा उत्सव नगर शहरात विशेष ओळख निर्माण करीत आहे.


श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष प्रीतम मुथ्था, इंजिनिअर सतीश पागा, आनंद दासरी, प्रविण गुंडू, शुभम दातरंगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी एकदंत गणेश मंडळ, एकदंत महिला मंडळ, एकदंत परिवार तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रीतम मुथ्था म्हणाले श्री एकदंत गणेश मंडळाने गणेश जयंती निमित्ताने राबविलेले विविध सामाजिक उपक्रम हे केवळ धार्मिक कार्यक्रमापुरते मर्यादित नसून त्यातून नगर शहरातील अनेक गरजू नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. रक्तदान, आरोग्य तपासणी, सामुदायिक विवाह, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप असे उपक्रम समाजाला दिशा देणारे आहेत. रोशन सुंकी, समीरा पागर, देवदत्त गुंडू यांची भाषणे झाली.

कार्यक्रमानंतर पुढील दिवसांत रक्तदान शिबिर, आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर, दप्तर वाटप, सांस्कृतिक कार्यक्रम, हळदी-कुंकू समारंभ, सामुदायिक विवाह सोहळा तसेच मुख्य गणेश जयंती दिनी विविध धार्मिक विधी होणार आहेत.

## शब्दकोडे-७४



१) आरडाओरड, गडबड
४) कुंभाराची भट्टी
५) आश्रय
७) पाणी
८) आश्चर्याची गोष्ट
१०) हाक, हाकेला दिलेले उत्तर
११) कामदेव
१३) वस्तू तयार करण्यासाठीचे उपकरण
१५) आंब्याचे रान
१७) चिंतन
१९) नाकारणे
२१) श्वासोच्छ्वास
२३) मध
२५) एकटा, पखरण
२६) निमित्त
२७) जहाज लुटणारे
२८) पुष्कळ
२९) पातळ खांब
३०) हिस्सा, भाग
३१) छोटासा
३४) शीतलता निर्माण करणारा चंद्र
३५) मांजर
३६) संरक्षक भिंत
३७) गिरि
४०) अलमारी
४२) कोणत्याही गोष्टीने मर्यादा ओलांडली की त्याचा नाश होतो या अर्थाची म्हण
४३) कबूतर
४४) दारावरील आवाज
४६) सत्वांश
४७) पैशाचा ढीग
४८) केर
४९) मोठी टोपली
५१) केस
५२) लबाडी, कारस्थान
५४) मंत्रीमंडळ
५६) हत्तीचे ओरडणे
५७) औषधी गराची काटेरी वनस्पती
५८) फळांचे पेय
५९) घर
६०) विविध, अनेक.

**उभे शब्द**

१) वाफेचे इंजिन असलेल्या आगगाडीचे इंधन
२) खून, वध
३) अल्प, थोडे
४) जननी
५) शर्ट
६) रावणाचा वध करणारा
७) जन्म
९) आवडता, प्रिय
१०) समोरासमोरची चकमक
१२) संयमन, दाबून टाकणे
१४) धडक
१६) परमेश्वर
१८) नव्या वस्तूचे कौतुक अल्पकाळ टिकते ह्या अर्थाची म्हण
१९) मोठी नदी
२०) प्रज्वलित, पूर्ण तापलेले, रसाने भरलेले
२२) सणाचे दिवस
२३) चर्चा
२४) करमणूक
२६) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
२९) वेडावाकडा
३२) सोन्याची शाई
३३) भेग, चीर
३८) महाराष्ट्रातील एक थंड हवेचे ठिकाण
३९) शिंपल्यात सापडणारे रत्न
४१) बासरी
४२) शर्त, पण
४३) सीमा, मर्यादा
४४) निबर, कडक
४५) मडके
४६) जोराचा, प्रहार, जोर
४८) बशीचा जोडीदार, बक्षीसाचे पात्र
५०) नव्वद अंशाच्या आतील कोन
५१) असडीक तांदूळ, भरड
५२) '*** काळजात घुसली' एक संगीत नाटक
५३) उत्तराधिकारी
५४) यशस्वी
५५) पाठविलेला

## शब्दकोडे-७३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | व | र्त | क | | अं | म | ल | | ब | | गो | ध | न |
| म | र | | व | सं | त | | ह | वा | ल | दा | र | | ग |
| दा | द | ला | | वा | र | क | री | | वा | र | स | दा | र |
| | ह | ट | वा | दी | | न | | स | न | | | वा | |
| म | स्त | | ह्या | | मु | का | मा | र | | अ | न | न | स |
| च | | पा | त | क | | च | ल | | म | त्ता | | ल | व |
| म | ह | क | | ट | पा | ल | | प | स | र | ट | | ल |
| ची | | शा | ळ | क | री | | क | र | | | प | र | त |
| त | र | स | | ट | | क | म | त | र | ता | | ट | |
| | वा | न | वा | | मु | स | ळ | | य | | पा | र | वा |
| ध | न | | स | र | का | र | | अं | त | र | पा | ट | |
| | गी | ता | | वा | द | | बा | क | | ज | | | वा |
| सा | | ट | | ना | म | दा | र | | म | क | रा | ल | य |
| व | हि | वा | ट | | | ता | व | दा | न | | जा | | ल |

## आपले भविष्य

**दि.१८/०१/२०२६ ते २४/०१/ २०२६**

**शिरीष कुलकर्णी मो.नं.८७८८२६६६९०**

**मेष:** **अधिकारी वर्ग प्रशंसनीय कामगिरी करेल.** बौद्धिक क्षेत्रात कर्तृत्वाच्या उत्तम संधी लाभतील. स्वतःच्या अधिकाराचा वापर करताना तारतम्य ठेवणे आवश्यक आहे. शिस्त आणि नियमात लवचिकता आणणे आवश्यक आहे. कर्मचारी व सहकारी यांच्याकडून निर्माण केलेल्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागेल. बँका आणि इतर वित्त क्षेत्र तसेच शिक्षण क्षेत्र यातील अधिकारी वर्ग प्रशंसनीय कामगिरी करेल. उत्तरार्धात कौटुंबिक आणि आरोग्य चिंता सतावतील.

**वृषभ:** **यशप्राप्तीसाठी व्यावसयिक संघर्ष करावा लागेल.** आरोप प्रत्यारोप आणि उपक्रमांना आलेले अपयश यामुळे विचलित व्हाल. संभ्रम वाढेल. वादविवाद टाळू शकलात तर योग्य निर्णय घेऊन योग्य मार्ग निवडू शकाल. अध्यात्मिक क्षेत्रात सत्संग लाभेल. मंगळवारी आणि बुधवारी यशप्राप्तीसाठी व्यावसयिक संघर्ष करावा लागेल. काही जणांना तडजोडीत समाधान मानावे लागेल. उत्तरार्ध कुटुंब सुखाचा तर सप्ताहाचा शेवट परिश्रमाचे परिवर्तन यश प्राप्तीत होईल.

**मिथुन:** **हेव्यादाव्यातून नुकसान संभवते.** प्रत्येक प्रसंगात मानसिक संतुलन राखणे महत्वाचे आहे. स्वतःच्या आणि पत्नीच्या आरोग्य चिंता वाढण्याची शक्यता आहे. अविचारी कृती अथवा जोखमीच्या कृतीतून शारीरिक अपाय होण्याची शक्यता आहे. बौद्धिक क्षेत्रातील वर्गाने तसेच वित्त क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी आर्थिक शिस्त पाळणे अनिवार्य राहील. सप्ताहाच्या शेवटी हेव्यादाव्यातून नुकसान संभवते.

**कर्क:** **नोकरदारांना विरोधाचा सामना करावा लागेल.** पती पत्नीत तीव्र मतभेद होण्याची शक्यता.अनावश्यक परखडपणा नात्यातील दुरावा वाढवू शकतो. पत्नीचे आरोग्य नाजूक राहील. भागीदारी व्यवसायात भागीदाराच्या अविचाराने आर्थिक नुकसान होणे शक्य आहे. रक्तदाबाचे विकार असणाऱ्या स्वतःच्या आरोग्याबाबत दक्ष राहून पथ्याबाबत काटेकोर रहावे. उत्तरार्धात आप्तेष्ट नाराज राहतील. सप्ताहाच्या शेवटी नोकरदारांना विरोधाचा सामना करावा लागेल.

**सिंह:** **वृद्धांना आरोग्यपिडा शक्य आहे.** कृतीप्रधान आणि कर्तृत्वाला पूरक काळ असला तरी आरोग्यात तीव्र चढ उतार होऊ शकतात. गुढघा लचकणे मुरगळणे अशा घटनांपासून स्वतःला जपणे आवश्यक आहे. अधिकारी वर्गाला कर्मचाऱ्यांच्या नाराजीचा सामना करावा लागेल. उत्तरार्धात पदलाभ होऊन अधिकारात आणि जबाबदारीत वाढ होण्याची शक्यता आहे. सप्ताहांती घरातील वृद्धांना आरोग्यपिडा शक्य आहे.

**कन्या :** **शत्रुत्व टाळा.** उतावळेपणाने घेतलेले निर्णय भावनिक आणि आर्थिक नुकसान करू शकतात. शब्दिक शस्त्राने संबधितांना मनोयातना देणे टाळा. त्यातून शत्रुत्व निर्माण होण्याची भीती आहे. पूर्वग्रहदूषित कृतीमुळे स्वतःची प्रतिमा मलीन होण्याही शक्यता आहे. मुलामुलींच्या अविचारावर आणि धाडसी कृतीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील. गुरु भ्रमण उत्तरार्धात नोकरी उद्योगातील व्यस्तता आणि ताण वाढवेल.

**तूळ:** **उच्च शिक्षणार्थींना अपेक्षित यश लाभेल.** गैरसमजातून वादविवाद वाढण्याची शक्यता आहे. संभाषणात, कृतीत आणि विचारात पारदर्शकता ठेऊ शकलात तर आप्तेष्टांची नाराजी टाळता येईल. बुध आणि शुक्र काही आनंदाचे आणि समाधानाचे क्षण जरूर बहाल करतील. व्यावसायिक कर्तृत्व तुमच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावेल. उत्तरार्धातील गुरु भ्रमण संततीबाबत सुवार्ता देईल. उच्च शिक्षणार्थींना अपेक्षित यश लाभेल.

**वृश्चिक:** **पुत्रचिंता सतावेल.** नोकरारांना कर्तृत्वाच्या उत्तम संधी लाभतील. संतुलित बोलणे तुमची प्रतिमा उंचावेल. अधिकारी वर्गाचा नोकरीत मान वाढेल. हातून प्रशंसायोग्य कामगिरी घडेल. परिश्रम पूर्वक तुम्ही उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल कराल. अष्टम स्थानातील गुरु तुमच्या आरोग्यावर मर्यादा आणेल. योग्य खबरदारी घेतल्यास नवी व्यावसयिक आव्हाने पेलू शकाल. सप्ताहाच्या शेवटी पुत्रचिंता सतावेल.

**धनु:** **डोळ्यांची विशेष काळजी घ्या.** शब्दाने शब्द वाढतील. भांडणे होतील. वैय्यक्तिक पातळीवरील टीका टाळा. बेतालपणे होणारा आर्थिक अपव्यय नुकसानकारक ठरेल. छोट्या चोरीने काही जणांना आर्थिक नुकसान संभवते. स्वतःच्या डोळ्यांची आणि दातांची विशेष काळजी घेणे योग्य ठरेल. सप्ताहाच्या शेवटी विवाहेच्छूंच्या दैनंदिनीत अनुकूल घटना घडतील.

**मकर:** **उतावळेपणा कटाक्षाने टाळा.** मानसिक अस्वस्थता वाढती राहील. वेळोवेळी स्वतःच घेतलेल्या निर्णयाबाबत खात्री वाटणार नाही. रागाचा पार तीव्रतेने वर खाली होत राहील. उतावळेपणा कटाक्षाने टाळा. परखडपणा आणि बोचरी टिका तुमच्या बाबतचे गैरसमज वाढवेल. नोकरी आणि उद्योगात वादविवादाचे सत्र चालत राहील. उत्तरार्धात षष्ठ स्थानातील गुरु स्वतःच्या आरोग्याबाबत दक्षता बाळगण्याचे संकेत देतो आहे.

**कुंभ:** **नोकरदारांना नवनव्या समस्यांना तोंड द्यावे लागेल.** स्वतःच्या शारीरक आणि मानसिक आरोग्याचे संतुलन राखा.पाय आणि गुढघे यांची विशेष काळजी घ्या. कौटुंबिक चिंता आणि कौटुंबिक खर्चाचे प्रमाण वाढेल. नोकरदारांना नवनव्या समस्यांना तोंड द्यावे लागेल. ऐहिक सुखांचा आनंद घ्याल. टीका आणि टोमणे यामुळे संबंधित व्यक्ती दुखावल्या जाण्याची शक्यता आहे. आपापल्या क्षेत्रात तुमच्या निर्णयांची आणि कामाची प्रशंसा होईल.

**मीन:** **शब्द तोलून-मापून वापरा** नोकरदारांना कर्तृत्वाच्या नवनव्या संधी लाभतील. मान सन्मान लाभतील आणि कामाचे कौतुक होईल. वरिष्ठ पातळीवरून तुमच्या उपक्रमांची दखल घेतली जाईल. नवे अधिकार आणि पद यांचा काही जणांना लाभ होऊ शकतो. चर्चा करताना आपले शब्द तोलून मापून वापरणे आवश्यक आहे. तुमच्या राशीतील शनी मानसिक अस्वास्थ्य वाढविणार असला तरी सकरात्मक विचार तुमची आगेकूच चालू ठेवतील.



# शिबिरात ४७ जणांवर मोफत प्लॅस्टीक शस्त्रक्रिया

**समाचार/संगमनेर-दि.१७**

डॉ शरदकुमार दिक्षीत यांचे स्मृतीप्रित्यर्थ लायन्स क्लब ऑफ संगमनेर आयोजित मोफत प्लॅस्टिक शस्त्रक्रिया शिबीर दि ११ व १२ जानेवारी या कालावधीत डॉ प्रविणकुमार पानसरे यांच्या धन्वंतरी हॉस्पिटल येथे संपन्न झाल्याची माहिती प्रकल्प प्रमुख डॉ सुचित गांधी व राणीप्रसाद मुंदडा यांनी दिली. याबाबत अधिक माहिती देताना डॉ गांधी यांनी सांगितले की लायन्स क्लब ऑफ सगमनेर गेली २६ वर्षे मोफत प्लॅस्टिक शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करीत आहे,फाटलेले ओठ, टाळूवरील छिद्रे, तिरळेपणा, शरीरा वरील विविध प्रकारचे व्रण, डाग, गाठी, वाकडे नाक, कान तसेच जन्मत: हाता पायांच्या बोटांची व्यंगे आदीप्रकारच्या व्यंग्य असलेल्या व्यक्ती न्यूनगंडामुळे समाजात मोकळेपणाणे वावरत नाहीत अनेकांची लग्न रखडलेली असतात तर काहींना नोकरी मिळत नाही, दैनंदिन काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अशा गरजवंत रूग्णांच्या शस्त्रक्रिया या शिबीरात करण्यात येतात.

अमेरिकेचे प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन डॉ शरदकुमार दिक्षीत यांचे सहयोगी डॉ लेरी वेनस्टन व डॉ व्हिटने आणी सहकारी अमेरिकेहून येऊन या दोन दिवसाच्या शिबीरात शस्त्रक्रिया केल्या आहेत. या दोन दिवसांत सुमारे १५० रूग्णांची तपासणी होऊन साधारण पणे ४७ प्रकारच्या शस्त्रक्रिया या शिबीरात करण्यात आल्या आहेत. दुभंगलेले ओठ, वाकडे कान व नाक, कानामागील मोठा गळू, चेह-यावरील गालावर वाढलेली मोठी गाठ ,हाताची पायाची चिकटलेली बोटे, विवीध प्रकारचे व्रण व गाठी आदी प्रकारच्या व्यंगांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

डॉ लेरी वेनस्टन यांनी मार्गदर्शन केले. सदरचे शिबीर चालू असताना माजी आमदार डॉ सुधिर तांबे, मालपाणी उद्योग समुहाचे संचालक व आंतरराष्ट्यि लायन्स क्लबचे बहुप्रांतीय परिषदेचे माजी चेअरमन ला गिरीष मालपाणी, नगराध्यक्षा डॉ मैथिली तांबे, ओम मयूर ज्वेलर्सचे महेश मयूर, मर्चंट बँकेचे चेअरमन मधुसूदन नावंदर, आशिष बुब, एकनाथ पानसरे आदींनी सदिच्छा भेट देऊन शिबीरार्थींची विचारपुस केली व क्लबच्या उपक्रमाचे कौतुक केले.

# सावित्री ज्योती महोत्सवास प्रारंभ



**समाचार/नगर-दि.१७**

गुलमोहर रोड, सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात आज पासून (दि.१७) सावित्री ज्योती महोत्सवास प्रारंभ होत असून, नगरकरांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य संयोजक तथा जय युवा अॅकॅडमीचे अध्यक्ष ड. महेश शिंदे यांनी केले.

अहिल्यानगर महापालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर बार असोसिएशन, समाजकार्य महाविद्यालय व जिल्हाभरातील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून बचत गटांचे वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे.

या चार दिवसीय प्रदर्शनात विविध सत्रात पोपट पवार, आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, मेरा युवा भारतचे जिल्हा समन्वय अधिकारी सत्यजित संतोष, महाविमचे उमेश कहाते, शब्दगंधचे राजेंद्र उदागे, ड. मेहरनाथ कलचुरी, जिल्हा विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, ड. भूषण बऱ्हाटे, डॉ. सुरेश पठारे, डॉ. रमेश वाघमारे, ड. प्रशांत साळुंके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. रेणुका पाठक, डॉ. संदीप शिंदे, मंगल भुजबळ, सुजाता देवळालीकर, जयश्री पोटे, विद्या सोनवणे, संभाजी गिरी, डॉ. अमोल बागुल, नानासाहेब बेल्हेकर, सुनील गायकवाड, अॅड. कृष्णा झावरे, हेलन पाटोळे, प्रवीण कोंढावळे आदी मान्यवर विविध सत्रात उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटक म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश योगेश पैठणकर, धर्मदाय उपायुक्त नवनाथ जगताप उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी मॅरेज ब्युरो वधू-वर नोंदणी होणार आहे. महोत्सवाचे हे दहावे वर्ष असून, या वर्षी मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजी नगर, जळगाव, बीड, हिंगोली, नांदेड, अहिल्यानगर जिल्ह्यातील बचत गट, महिला लघु उद्योगांचे स्टॉल असणार आहेत.

या चार दिवसीय महोत्सवात जिल्हा रुग्णालय, मनपा आरोग्य विभाग मार्फत दररोज मोफत आरोग्य तपासणी, निबंध, वकृत्व, चित्रकला, हस्तकला, नृत्य, पथनाट्य, मेहंदी, युवक युवतींना मोफत कायदेविषयक मार्गदर्शन, भजन स्पर्धा, लोककला सादरीकरण, वीर पत्नी-वीरमातांचा गौरव, महिला वकिलांचा गौरव, अहिल्यानगर बार असोसिएशनच्या नवीन कार्यकारणीचा गौरव, सावित्री ज्योती गौरव पुरस्कार वितरण, सामाजिक संस्थांना मार्गदर्शन, राष्ट्रीय युवा सप्ताह असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

# युनियन बँकेला ५०१७ कोटींचा नफा

**समाचार/नगर-दि.१७**



सार्वजनिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या युनियन बँक ऑफ इंडियाने आर्थिक वर्ष २०२५ - २६ च्या तिसऱ्या तिमाहीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अत्याधुनिक ग्राहक सेवा देत ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळे बँकेला ५०१७ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळाला असल्याची माहिती बँक प्रशासनाने दिली.

बँकेचा एकूण व्यवसाय २२.३९ लाख कोटींच्या पुढे गेला आहे. सातत्यपूर्ण वाढ आणि मालमत्ता गुणवत्तेतील सुधारणा यामुळे ही प्रगती साध्य झाल्याचे बँकेने स्पष्ट केले.

३१ डिसेंबर २०२५ रोजी समाप्त झालेल्या तिमाहीत बँकेचा नफा मागील तिमाहीच्या तुलनेत १८.०७ टक्क्यांनी वाढलेला आहे. या कालावधीत बँकेचा ऑपरेटिंग नफा ६,९४२ कोटी इतका राहिला, तर निव्वळ व्याज उत्पन्न (NII) ५.८५ टक्क्यांनी वाढून ९,३२८ कोटींवर पोहोचले.

कार्यक्षमता निर्देशांकातही सुधारणा दिसून आली असून, निव्वळ व्याज मार्जिन २.७६ टक्के, मालमत्तेवरील परतावा (RoA) १.३५ टक्के आणि भागधारक भांडवलावरील परतावा (RoE) १७.०९ टक्के इतका नोंदवण्यात आला आहे. देशांतर्गत CASA गुणोत्तर ३३.९६ टक्क्यांवर स्थिर राहिले असून, कमी खर्चाच्या ठेवींवर बँकेचा भर कायम असल्याचे यावरून स्पष्ट होते.

किरकोळ, कृषी व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रांवर बँकेचा धोरणात्मक भर कायम असून देशांतर्गत एकूण कर्जपुरवठ्यात या क्षेत्रांचा वाटा ५८.८४ टक्के इतका आहे. किरकोळ कर्जपुरवठ्यात वर्षभरात २१.६७ टक्क्यांची वाढ झाली असून गृहकर्ज व वाहन कर्ज यामुळे ही वाढ साध्य झाली आहे. तसेच चड्चए क्षेत्रातील कर्जपुरवठा १९.७५ टक्क्यांनी वाढला आहे.

# धनगर समाज सेवा संघाचा रविवारी वधू-वर परिचय मेळावा

**समाचार/नगर-दि.१७**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी धनगर समाज सेवा संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने सर्व शाखीय धनगर समाजातील विवाहोत्सुक वधू-वरांचा १० वा परिचय मेळावा तसेच गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ रविवार, दि. १८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. समाजातील युवक-युवतींच्या विवाह जुळणीसाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार आहे,अशी माहिती अध्यक्ष राजेंद्र तागड, निशांत दातीर यांनी दिली. या कार्यक्रमाचे उदघाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे १३ वे वंशज भुषणसिंहराजे होळकर यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. गोपीचंद पडळकर राहणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून आ. बाबासाहेब देशमुख, माजी खा. सुजय विखे, आ. संग्राम जगताप, सुरेशानंदजी महाराज (शास्त्री) उपस्थित राहणार आहेत. याशिवाय शिवाजीराव बंडगर, विठ्ठलराव वाडगे, दत्तात्रय गावडे, सुदाम तागड, शशिकांत राहिंज, चंद्रकांत तागड, सोपानराव शिकारे, अशोकराव मिसाळ, बापूसाहेब नजन, अर्जुनराव कजबे, गजेंद्र राशिनकर यांच्यासह अनेक उद्योजक, प्रगतशील शेतकरी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी व समाजातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच नगरसेविका शारदा ढवण, कलावती शेळके,कमल राहिंज, गणेश कोरडे, ज्योती ढवण यांचीही उपस्थिती राहणार आहे. हा मेळावा गंगा लॉन, निर्मलनगर, येथे सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत संपन्न होणार आहे, असे संघाचे सचिव विनायक नजन, सुभाष जाडकर, भाऊसाहेब वाव्हळ, सूर्यकांत तागड, भाऊसाहेब तोगे, नामदेव खंडागळे, कुंडलिक भागवत यांनी केले आहे.

# नगरसेवक अॅड. गंधे यांचा सत्कार

**समाचार/नगर-दि.१७**




महानगर पालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक तीन मधून अँड .ऋग्वेद गंधे यांची नगरसेवक पदी निवड झाली. या यशाबद्दल गुलमोहोर रोड येथे राष्ट्रवादी काँग्रेस (२२५) विधानसभा अध्यक्ष सुमित कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे,सावेडी मंडल अध्यक्ष रेणुका करंदीकर ,उपाध्यक्ष श्वेता झोंड, जिल्हा सरचिटणीस ज्योती दांडगे,प्रशांत चौधरी आदींच्या उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक व विकासात्मक कार्याचा गौरव केला.

सत्काराला परिसरातील नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना ऋग्वेद गंधे यांनी मतदारांचे आभार मानले व प्रभागातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, शिक्षण व आरोग्य या मूलभूत प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्याचे आश्वासन दिले. सर्वांना सोबत घेऊन पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सुमित कुलकर्णी म्हणाले, आज आपल्या परिसरासाठी अभिमानाचा क्षण आहे. ऋग्वेद गंधे यांची नगरसेवक पदी निवड झाली असून, त्यांच्या कार्यक्षमतेवर व सामाजिक बांधिलकीवर जनतेने विश्वास दाखवला आहे. त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रमांतून आपली कामगिरी सिद्ध केली आहे. पुढील काळात ते प्रभागाच्या विकासासाठी नक्कीच प्रभावी नेतृत्व देतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

# प्रा. औताडे,मिसार यांना पीएच.डी.

**समाचार/नगर-दि.१७**





एन एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर येथील फार्माकोलॉजी विभागातील दोन होतकरू व गुणवंत प्राध्यापिका कल्याणी औताडे व प्रणया मिसार यांनी आपले पीएच डी. संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण करून डॉक्टरेट पदवी प्राप्त केली आहे. सध्या त्या दोघीही संस्थेत सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

डॉ. कल्याणी औताडे यांना पुणे विद्यापीठा तर्फे डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. हे संशोधनकार्य त्यांनी डॉ. रामदास पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

व डॉ. प्रणया मिसार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठा तर्फे पदवी प्रदान करण्यात आली. हे संशोधनकार्य त्यांनी किशोर वि. ओतारी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य डॉ.विशाल पांडे यांनी दिली.

# मंत्री विखे यांचे निर्विवाद नेतृत्व सिद्ध - देशमुख

**समाचार/नगर-दि.१७**



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महानगरपालिका निवडणुकीच्या सुरुवातीपासून अत्यंत सावधपणे पाऊले टाकत शहराची जबाबदारी माजी खा. डॉ. सुजय विखे पा. व आमदार संग्राम जगताप या युवा नेतृत्वाकडे सोपविली आणि आपल्या चाळीस वर्षांच्या राजकीय अनुभवाचे कसब वापरत अहिल्यानगर शहरातून तुतारी हद्दपार केली, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे निवडणूक जिल्हा समन्वयक विनायक देशमुख यांनी व्यक्त केली.

मंत्री विखे यांनी शहराच्या राजकारणात प्रथमच लक्ष घातले. निवडणुकीचे उमेदवार निवडण्याची प्रक्रिया असो किंवा युतीतील जागा वाटप असो याबाबत चर्चे चा फारसा घोळ न घालता निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य डॉ.सुजय विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून नव्या पिढीला दिले . हे करत असताना पक्षातील नव्या जुन्या सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेण्यासाठी पालकमंत्री विखे यांनी विशेष प्रयत्न केले . निवडणुकीच्या काळात जवळपास आठवडाभर विखे यांनी शहरात तळ ठोकला होता. या काळात त्यांनी लहान मोठ्या सर्व कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्या. एका बाजूला डॉ. सुजय विखे पा.व आ. संग्राम जगताप निवडणुकीच्या रणांगणावर निवडणुकीतील सर्व तंत्रे वापरत भक्कमपणे किल्ला लढवत होते तर दुसरीकडे ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पडद्याआड राहून भाजप-राष्ट्रवादी युतीच्या मोठ्या विजयासाठी मशागत करुन पायाभरणी केली. त्यामुळेच या युतीला नेत्रदीपक विजय संपादन करता आला. असे देशमुख म्हणाले.

निवडणुकीच्या काळात राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची अहिल्या नगर येथील जाहीर सभा व त्या सभेतील महिलांची मोठी उपस्थिती निर्णायक ठरली. या निवडणुकीच्या निकालावरून अहिल्यानगर शहरातील सुज्ञ मतदारांनी तुतारीला पूर्णपणे नाकारले असल्याचे सिद्ध झाले आहे. या जनभावनांची दखल घेऊन आतातरी ही मंडळी आपल्या भाषणबाजीने पोकळ आव्हाने देऊन स्वत::चे हसे करून घेणार नाहीत,अशी अपेक्षा देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

# गोरक्षनाथ गडावर धर्मनाथ बीज उत्सव

**समाचार/नगर-दि.१७**

अहिल्यानगर जिल्ह्यातील मांजरसुंबा (ता. अहिल्यानगर) येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर सालाबादप्रमाणे यंदाही मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी धर्मनाथ बीज उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. श्री गोरक्षनाथ देवस्थान ट्रस्ट, मांजरसुंबा यांच्या वतीने या धार्मिक व भक्तीमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांना या दिवशी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड, मांजरसुंबा येथे मंगळवार, दिनांक २० जानेवारी रोजी पुढील कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ८:०० वाजता: श्री गोरक्षनाथ महाराजांचा अभिषेक (महापूजा) सकाळी १०:०० ते १२:००: किर्तनकेसरी ह.भ.प. संतोष महाराज वनवे (बीड) यांचे जाहीर हरीकिर्तन दुपारी १:०० ते ४:००: महाप्रसादाचे आयोजन देवस्थान ट्रस्टतर्फे भाविकांसाठी सर्व धार्मिक व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. भाविकांनी या दिवशी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिषेक, हरिकीर्तन आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# हळदी-कुंकू कार्यक्रमातून मतदानाविषयी जनजागृती

**समाचार/नगर-दि.१७**

महिला, माता व पालकांमध्ये मतदार जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने जानकीबाई आपटे बालिकाश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे सोमवार, दि. १२ जानेवारी रोजी महिला माता मतदार जागृतीचा हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव दीप्ती करंदीकर होत्या. यावेळी ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका शर्मिला कुलकर्णी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका पठाण , साळवे , विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल सुद्रिक, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेच्या सचिव दीप्ती करंदीकर यांनी महिला माता व पालकांशी संवाद साधत मतदानाचे महत्त्व, प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावण्याची गरज, तसेच महिलांची लोकशाही प्रक्रियेत असलेली जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सुजाण माता व जागरूक महिला या सक्षम समाजाच्या आणि मजबूत लोकशाहीच्या आधारस्तंभ असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. शर्मिला कुलकर्णी यांनी उपस्थित महिलांना तिळगुळ वाटप करून मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या तसेच मतदान जागृतीबाबत मार्गदर्शन करत गोड बोलू, गोड राहू आणि मतदान जरूर करू असा संदेश दिला. महिलांनीही उत्स्फूर्तपणे कार्यक्रमात सहभाग घेत मतदानाबाबत आपले अनुभव मांडले.अशा उपक्रमांमुळे महिलांमध्ये मतदानाविषयी जागरूकता वाढून लोकशाही अधिक बळकट होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. आभार शैख सुहेल यांनी मानले.

२८ जानेवारीपर्यंत भरगच्च कार्यक्रम; तयारी पूर्ण

# समर्थ रामदास स्वामी पादुका सोमवारी शहरात



**समाचार/नगर-दि.१७**

सज्ञनगड येथील श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे सोमवारी दि.१९ जानेवारी रोजी शहरात आगमन होत आहे. दिल्लीगेटजवळ सायंकाळी ५ च्या सुमारास पादुकांचे आगमन होताच मंगल वाद्यांच्या निनादात पुष्पवृष्टी करत स्वागत केले जाईल, अशी माहिती समर्थभक्त सुनील रामदासी आणि श्री समर्थ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश क्षीरसागर यांनी दिली.

ते म्हणाले, आपल्या अहिल्यानगरीत श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या पादुका येण्याचे निश्चित झाल्यापासून श्रीरामरायांच्या आणि श्रीसमर्थांच्या भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आपल्या निवासस्थानी पादुकांचे पूजन करण्यासाठी सुरू केलेल्या नाव नोंदणीस भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रीसमर्थांच्या पादुकांसमोर भजन, गायन आणि कीर्तन सेवेकरिता सुरेख आखणी करण्यात आली. श्रीसमर्थ मंडळ ट्रस्टकडून यावेळी प्रथमच नियोजन केले जात असले तरी याआगोदरचा हा पादुका दौरा यशस्वी केलेल्या समर्थ भक्तांची साथ घेऊन अथक परिश्रम घेण्यात आले आहेत. दि.२८ जानेवारीपर्यंत भरगच्च कार्यक्रम होणार असल्याने जय्यत तयारी करण्यात आली आहे. दि.२८ जानेवारी २०२६ ला नगरमधूनच पादुका सज्ञनगडकडे प्रस्थान करणार आहेत.

दि.१९ ते २८ जानेवारी दरम्यान दररोज सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत शहरात भिक्षा फेरीचे नियोजन करण्यात आले आहे. शहराच्या अधिकाधिक भागात भिक्षा फेरी होईल. शहराच्या मध्यवस्तीमधील चितळे रोडवरील ऋग्वेद भवन मध्ये पादुकांचा मुक्काम असल्याने भाविकांना येथे पादुकांचे नित्य दर्शन घेण्याचा आनंद घेता येईल. ऋग्वेद भवनमध्ये सकाळी ६ ते ७ काकड आरती, पादुकांची षोडशोपचार पूजा व आरती. सकाळी ८ ते दुपारी १२ दैनंदिन भिक्षा फेरी, दुपारी २.३० ते ४ भजनी मंडळांची भजन सेवा, सायंकाळी ५ ते ६.३० भक्तीगीत गायन सेवा, सायंकाळी ७ ते ८.३० नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा, रात्री ८.३० वाजता सायं उपासना, करूणाष्टके, सवाया, पादुकांची पूजा व आरती, रात्री १० वाजता शेजारती असे दिवसभर भरगच्च कार्यक्रम संपन्न होतील. सोमवार दि.२६ जानेवारीला सायंकाळी ७ ते ९.३० या वेळेत संगीत रामदासायन हा सुश्राव्य कार्यक्रम होईल. मंगळवारी दि.२७ ला दुपारी ३.३० वाजता शोभायात्रा काढण्यात येईल.

सोमवारी दि.१९ जानेवारी २०२६ ला सायंकाळी ५ वाजता दिल्लीगेटजवळ पादुका येताच तेथून सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. चौपाटी कारंजा मार्गे ही मिरवणुक ऋग्वेद भवनमध्ये पोहोचेल. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी पादुकांवर पुष्पवृष्टी केली जाईल. शहरातील आणि उपनगरातील भाविकांनी पादुकांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन या सोहळ्याचे संयोजक सुनिल रामदासी, श्री समर्थ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, खजिनदार पुरूषोत्तम बेदरे, सचिव महेश कुलकर्णी, रविंद्र कुलकर्णी, मिलिंद जोशी, नरेंद्र ल. कुलकर्णी, विश्वस्त मंडळ आणि सोहळ्याचे प्रसिध्दी प्रमुख मिलिंद चवंडके यांनी केले आहे.

# नगरमध्ये २५ रोजी संगीत मैफल

**समाचार/नगर-दि.१७**

येत्या २५ जानेवारी, रविवार सायं. ६:०० वाजता माऊली सभागृह येथे सूरसंगम संगीत प्रस्तुत 'जिंदगी का सफर' या शीर्षकखाली विशेष दर्दभरे जुन्या हिंदी चित्रपटातील ६० ते ८० दशकातील प्रसिद्ध एकल व युगल गाणी असतील. या संगीत मैफिल कार्यक्रमात स्व. मुकेश माथूर, लता मंगेशकर, आभास कुमार गांगुली, मोहम्मद रफी व आशा भोसले यांची गाणी असतील.

सूरसंगम समूहाचे सलग तिसरे वर्ष असून दर्जेदार कार्यक्रम असतात. नगरचे कलाकार- गायक हेमंत दंडवते, अभय कांकरिया, वैजू चांदवले पुणे, सुमित कर्णिक कल्याण व सूत्रसंचालन देवाशीष शेडगे पुणे यांचा कार्यक्रमात सहभाग आहे. कार्यक्रम प्रमुख पाहुणे डॉ. दमन काशीद असणार आहे.

कार्यक्रम विनामूल्य असून प्रवेशिका दिलेल्या पत्यावर उपलब्ध आहे राज ऑप्टिक्लस- ऋणानुबंध रेणुका अपार्टमेंट, प्रोफेसर कॉलनी चौक संपर्क ९८२२०३३०३७, स्वागत झेरॉक्स, जुने कोर्ट समोर संपर्क ९४२३२०९४१६ व नाईस कॉम्प्युटर, दिल्ली गेट संपर्क ९८९०४८६७५६.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर फोन नंबर : २३२६९१४

जा. क्र. पतसंस्था फेडरेशन ३०२६/सन २०२५ दिनांक : २६/१२/२०२५

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा

ज्याअर्थी **पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, आनंदी बाजार, पटवर्धन चौक, ता. जि. अ. नगर** यांनी खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांविरूध्द महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असून त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमूद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहीर लिलावाने विक्री करित आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिणारांनी नमूद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव | गाव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा. रक्कम | गट नं. | क्षेत्र | आकार | वसुली दा. रक्कम | | | |
| | | | | | हे. आर. | रू. पै. | पूर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
| १. | कर्ज - सुनील अर्जुन लालबोंद्रे यांची मिळकत<br>जामि.- श्रीकांत लक्ष्मीकांत नांगरे<br>जामि.- महेश राजाराम नामदे | नागरदेवळे<br>भिंगार<br>भिंगार ता. अहिल्यानगर | १६९७२९०/- + होणारे व्याज + इतर खर्च | २८२/३ प्लॉट नं.४४ | १.५७.५० | १६.०० | मूळ नकाशाप्रमाणे | | | |
| २. | कर्ज - चव्हाण नरेश नीलदास यांची मिळकत व सहकर्जदार - चव्हाण नलिनी नीलदास यांची तारणतील मिळकत<br>जामि.- लालबेग संदीप उस्मान<br>जामि.- चव्हाण जय अर्जुन | बुऱ्हाणनगर<br>बुऱ्हाणनगर<br>गुलमोहोर रोड<br>जे. जे. कॉलनी ता.अहिल्यानगर | २२३५८३१/- + होणारे व्याज + इतर खर्च | ११५/१/२/ प्लॉट ४८ पैकी ४५/१अ/ ४५/१ब/ प्लॉट ४० | ०.९३ पैकी<br>०.२५.३५ | ९.३०<br>४.०० | मूळ नकाशाप्रमाणे | | | |

लिलावाचे ठिकाण व वेळ : **https://eauction.gov.in** या सांकेतिक स्थळावर **पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, आनंदी बाजार, पटवर्धन चौक, ता. जि. अ. नगर दि. २८/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांच्या आत वसूल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसूल पात्र रकमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहीर लिलावाने विक्री करून ही वसूल पात्र रकमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडून वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी. **लिलावाच्या दिवशी दि.२८/०१/२०२६** रोजी लिलावात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं. २ दि. ०२/०३/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** संस्थेच्या / कार्यालयात होईल. तसेच याही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किंमत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि.०५/०४/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता https://eauction.gov.in** या सांकेतिक स्थळावर **पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, आनंदी बाजार, पटवर्धन चौक, ता. जि. अ. नगर** या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

एम. ए. शेख
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ. नगर

स्थळ : अ. नगर
दिनांक : २६/१२/२०२५
शिक्का




आपल्या उज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...
SS 304 L टॅंक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध
देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर
(*अटी लागू)
- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे
आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर.
V-GUARD Solar Water Heater
9325103781



## पाहिजेत

चिचोंडी (शिराळ), ता. पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर येथील एका जैन तीर्थस्थानासाठी/धर्मादाय संस्थेसाठी खालील जागा भरावयाच्या आहेत -

| अनु.क्र. | पद | तपशील |
|---|---|---|
| ०१ | चिफ अकौंटंट | बी.कॉम किंवा तत्सम पदवीधर, चिफ अकौंटंट या पदाचा ५ ते १० वर्षाचा अनुभव असलेल्या व्यक्तीस प्राधान्य. |
| ०२ | अकौंटंट क्लार्क | बी.कॉम किंवा तत्सम पदवीधर, २ ते ३ वर्षाचा अनुभव असलेल्या व्यक्तीस प्राधान्य. |

उपरोक्त दोन्ही पदासाठी टॅली व कॉम्प्युटर डेटा एन्ट्रीचा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी खालील पत्त्यावर अर्ज पाठवावेत.

संपर्क
गुरु आनंद फौंडेशन
चिचोंडी (शिराळ), ता. पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर
M. 9850714164, E-mail : guruanandtirth@gmail.com



### नावात बदल

माझे जुने नाव VIMAL SAHEBRAO RENDHE असे होते व माझे नवीन नाव VIMAL SAHEBRAO RINDHE असे आहे. ही दोन्ही नावे माझीच असून, माझे सध्याचे सर्व व्यवहार VIMAL SAHEBRAO RINDHE याच नावाने होत आहेत.

VIMAL SAHEBRAO RINDHE

### नावात बदल

माझे जुने नाव SAHEBRAO SUKDEO RENDHE असे होते व माझे नवीन नाव SAHEBRAO SUKDEO RINDHE असे आहे. ही दोन्ही नावे माझीच असून, माझे सध्याचे सर्व व्यवहार SAHEBRAO SUKDEO RINDHE याच नावाने होत आहेत.

SAHEBRAO SUKDEO RINDHE





एका लग्नाची पुढची गोष्ट
आज शनिवार रात्रौ ८.३० वा. सहकार सभागृह, अ.नगर
सुपरहिट जोडीची धुमशान कॉमेडी
कलाकार अद्वैत दादरकर कविता मेढेकर प्रशांत दामले
ति.वि. ९.३० ते १२.३० व ५ ते ८ सभागृहावर सुरू
फोन बुकिंग संपर्क 8698686039
व्यवस्था-अनिकेत हळगावकर - 8698686039 संपर्क - संदिप सोनार- 9823056683



ॲडव्हान्स बुकिंग सुरू
my cinema
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow

Show :- Dt. 17 & 18 Jan 2026

AVATAR : Fire (3D Hindi) - 1:30, 7:00pm,
DHURANDHAR - 10:00 am, 1:45, 6:30pm,
ONE TWO CHA CHA - 2:45am, 8:15pm,
RAHU KETU (Hindi)- 8:45am, 12:15, 5:45pm,
28 YEARS LATER (2D English)- 11:30am,
KRANTIJYOTI VIDYALAYA (Marathi) - 11:05 am, 1:30, 4:30, 7:15pm, 10:00 pm, 28 YEARS LATER (2D Hindi) - 9:30 am, 5:00, 10:30pm,
AGA AGA SUNBAI KAY MHANTAY SASUBAI? (Marathi) - 10:15am, 1:00, 3:45, 10:05pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.



टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.१६/०१/२०२६ ते दि.२२/०१/२०२६

DHURANDHAR (हिंदी) 11.15 AM 05.45 PM 09.30 PM
क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम (मराठी) 09.00 AM 12.20 PM 03.15 PM 06.15 PM 09.00 PM
RAJASAAB (हिंदी) 9.00 AM 06.00 PM
अगं अगं सूनबाई.. (मराठी) 08.30 AM 12.00 PM 03.00 PM 03.15 PM 09.15 PM
for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
book my show CONNPLEX book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
संपर्क: 94 22 23 90 13 www.sextreatment.in


महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर

### ई-निविदा सूचना क्र. ३३ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) अहमदनगर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंताकडून फक्त निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर यांनी रोखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये | बयाणा रक्कम | निविदा संचाची फी रुपये | नोंदणी वर्ग | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत रामपूरवाडी अंतर्गत पाझर तलाव ते अण्णासाहेब देठे घर रस्ता खडीकरण करणे, ता. राहाता, जि. अहिल्यानगर (१.५ कि.मी.) | १०,७५,५४९/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| २. | ग्रामपंचायत शिंगवे अंतर्गत बारहाते गिरणी ते बाबासाहेब कवडे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, ता. राहाता, जि. अहिल्यानगर (१.५. कि.मी.) | ३०,५९,४१६/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ३. | ग्रामपंचायत टाकळी अंतर्गत प्रजिमा ५ जि. प. शाळा ते बाबासाहेब देवकर घर रस्ता ७ चारी खडीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | १०,६०,५४०/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ४. | ग्रामपंचायत जळगाव अंतर्गत विजय बबन चौधरी घर ते गोदावरी उजवा कालवा डांबरीकरण करणे, ता. राहाता, जि. अहिल्यानगर (०.७ कि.मी.) | २३,०७,८२५/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ५. | ग्रामपंचायत नाटेगाव अंतर्गत गावठाण ते येसगाव रोड जयराम धोंडीबा मोरे घर रस्ता डांबरीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | २१,३५,६२०/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ६. | ग्रामपंचायत वेळापूर अंतर्गत रामा ७ ते बिरोबा मंदिर (कारवाडी शीव) रस्त्यावर सी. डी. वर्क करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | १९,५२,६५८/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ७. | ग्रामपंचायत करंजी अंतर्गत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक सुशोभीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | ११,६५,२५८/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ८. | ग्रामपंचायत खिर्डी गणेश अंतर्गत नगर-मनमाड रस्ता ते रावसाहेब बावके वस्ती खिर्डी गणेश-आंचलगाव शीव रस्ता खडीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | १५,७५,८५०/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ९. | ग्रामपंचायत दहेगाव बोलका अंतर्गत वीरभद्र मंदिर ते नानासाहेब निघोट ते विजय पारकवस्ती रस्ता खडीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | १९,७२,५६२/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| १०. | ग्रामपंचायत खोपडी अंतर्गत बाळासाहेब मच्छिंद्र वारकरवस्ती ते दामोदर दगडू वारकरवस्ती (भऊर रस्ता) खडीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | ३१,५८,६६९/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| ११. | ग्रामपंचायत तळेगाव मळे अंतर्गत तळेगाव गावठाण ते भाऊसाहेब भवरवस्ती रस्ता करणे (बेलगाव रस्ता) खडीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | २०,४०,५८२/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| १२. | ग्रामपंचायत जेऊर कुंभारी अंतर्गत महेंद्र वक्ते घर ते बापू वक्ते घर रस्ता डांबरीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | १९,७५,४५२/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| १३. | ग्रामपंचायत मढी बुद्रुक अंतर्गत प्रामा ७ ते ग्रामा ३० रस्ता डांबरीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | ३१,५८,६००/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| १४. | ग्रामपंचायत जेऊर पाटोदा अंतर्गत जिजाऊ पार्क ते चंद्रलीलानगर प्रजिमा ८ रस्ता डांबरीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | २३,७०,५२८/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| १५. | ग्रामपंचायत धामोरी अंतर्गत विश्वास जाधववस्ती ते सत्यगाव रस्ता डांबरीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर (विठ्ठलराव जगझापवस्ती) | ३०,८४,३९९/- | Nil | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| १६. | ग्रामपंचायत सांगवी भुसार अंतर्गत माणिक गयाजी शिंदे घर ते सांगवी भुसार गावापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | ३१,६२,०००/- | Nill | ५९० | सु.बे. अभियंता | ६ महिने (पावसाळ्यासह) |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक १९/०१/२०२६ ते २७/०१/२०२६ |
| २. | निविदा पूर्व बैठक | :- | निरंक |
| ३. | निविदा उघडणे | :- | दिनांक : २९/०१/२०२६ कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वा. |
| ४. | Online निविदेची 'हार्ड कॉपी' सिलबंद लखोट्यात सादर करण्याचा दिनांक | :- | कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात दि. २९/०१/२०२६ रोजी १७.०० पर्यंत किंवा त्यापूर्वी |

सविस्तर निविदा सूचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. The Details of Work Provided in the Websites as below १. www.mahapwd.com २. https://mahatenders.gov.in ३. सदर निविदेतील कामे ही अहमदनगर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना मिळणाऱ्या सवलती अंतर्गत आहेत. ४. सदर कामाच्या सर्व किंवा एक निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

(आरओसी-२०२५-२६/क्र.५/C५१९६)

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर